
रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक १३० | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in




# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि.८ ऑक्टोबर २०२४

किंमत ४ ₹

### आज हरियाणा, जम्मू-काश्मीरचा निकाल

**नवी दिल्ली :** हरियाणा आणि जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभेसाठी नुकतेच मतदान पार पडले. हरियाणा राज्यात ५ ऑक्टोबर रोजी विधानसभेच्या ९० जागांसाठी एकाच टप्प्यात मतदान झाले, तर जम्मू-काश्मीरमध्ये ३ टप्प्यात झाले. यानंतर आता या दोन्ही निवडणुकीचे निकाल उद्या ८ ऑक्टोबरला लागणार आहे. या निकालासाठी मतमोजणी सकाळी आठ वाजता सुरु होणार आहे. या निकालाकडे देशाचं लक्ष लागलेलं आहे. जम्मू-काश्मीरमध्ये कलम ३७० हटविल्यानंतर पहिल्यांदाच निवडणूक होत आहे.





(छायाचित्र : समीर मालोदे)

# लाडक्या बहिणींची फसवणूक

## चित्रलेखा पाटील यांची सरकारवर टीका

। अलिबाग । प्रतिनिधी ।

राज्य सरकारने 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजना आणली. यातून महिलांना महिन्याला दीड हजार रुपये दिले. परंतु, दुसऱ्या बाजूला दैनंदिन व्यवहारातील वस्तूंच्या किमती भरमसाठ वाढविल्या आहेत. लसणासह कांदे-बटाट्यांचे भाव गगनाला भिडले आहेत. या महागाईमुळे महिलावर्गात संताप निर्माण झाला आहे. एका खिशातून पैसे द्यायचे आणि दुसऱ्या खिशातून पैसे काढायचे, ही सरकारची भूमिका आहे. लाडक्या बहिणींकडून पैसे घेऊन त्यांनाच त्यांचे पैसे दिले जात आहेत. आपल्याच करातील पैशातून सरकार आपलेच पैसे देत आहे. याची जाणीव प्रत्येक महिलेला असणे आवश्यक आहे. सरकार लाडक्या बहिणींची फसवणूक करीत आहे, अशी टीका शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी सोमवारी (दि. ७) केली.

### शेकाप शेतकऱ्यांच्या कायम पाठीशी

या भागात अनेक प्रकल्प आले. कंपन्यांनी आश्वासने दिली. परंतु, ती आश्वासने पूर्ण केली नाहीत. खाऱ्या पाण्यामुळे येथील सुपिक जमीन नापिक झाली. येथील शेतकरी भरपाईपासून वंचित आहे. या भागात अनेक प्रश्न आहेत. ते सोडविण्यासाठी शेतकरी कामगार पक्ष कटिबद्ध असून, शेकाप शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे, असे आश्वासन चित्रलेखा पाटील यांनी दिले.

### प्रश्न मार्गी लावणार

१ महिलांना रोजगार मिळेल, यादृष्टीने कारखाना उभारण्यासाठी प्रयत्न करणार.

२ बचतगट उभारून हजारो महिलांना रोजगाराचे दालन खुले करणार.

३ खारेपाटातील पाण्यासह अनेक रखडलेले प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करणार.

४ जिल्ह्यातील तरुणांना रोजगार देण्यासाठी कायम प्रयत्नशील राहणार.

### महिलांना आवाहन

१ समोर येणाऱ्या संकटांवर मात करण्याची क्षमता निर्माण करण्याची गरज

२ समाजात आमूलाग्र बदलासह सर्व घटकाला एकत्र आणण्याची गरज.

३ वाईट विकृतीविरोधात, व्यसनमुक्तीसाठीच्या लढ्यात महिलांची महत्त्वपूर्ण जबाबदारी.

४ सर्वांनी एकत्र येत समाजात बदल घडवून एक वेगळी क्रांती घडविण्याची गरज.

रायगड जिल्हा महिला बचतगट फेडरेशन पुरस्कृत 'लेक शिवबा'ची अंतर्गत भव्य महिला संवाद मेळावा वैजाळी हाशिवरे येथील बालवीर मैदानात आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी चित्रलेखा पाटील म्हणाल्या.

यावेळी जिल्हा परिषद माजी अध्यक्षा तथा अलिबाग अर्बन बँकेच्या अध्यक्षा सुप्रिया पाटील, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, उरण तालुका शेकाप महिला आघाडी प्रमुख सीमा घरत, रायगड जिल्हा महिला बचत गट फेडरेशनच्या उपाध्यक्षा वृषाली ठोसर, संजना कीर, शेकाप उरण शहर अध्यक्षा नैना पाटील, मुळेच्या सरपंच रोशनी पाटील, हाशिवरेच्या सरपंच शैला पाटील, सुप्रिया मोकल, अरुणा पाटील, समिधा पाटील, संध्या पाटील, जयश्री पाटील, शेकाप महिला आघाडीच्या पदाधिकारी, सदस्या, हाशिवरे विभागातील महिला हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी चित्रलेखा पाटील यांनी सांगितले की, शेकापच्या नेत्या तथा माजी राज्यमंत्री स्व. मीनाक्षी पाटील यांचे रायगडच्या विकासात एक वेगळे योगदान राहिले आहे. या भागातील प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी मीनाक्षी पाटील कायमच अग्रेसर राहिल्या. शेकापचे नेते जयंत पाटील यांच्याबरोबरच माजी आ. पंडित पाटील, जिल्हा परिषद माजी सदस्या भावना पाटील यांनीदेखील या विभागात एक वेगळी बांधणी केली आहे. यांच्याकडूनच प्रेरणा घेऊन वेगळ्या उमेदीने काम करण्यास पुढे आले आहे. या भागातील पाणी व अन्य प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी शेतकरी कामगार पक्ष कटिबद्ध आहे, असे चित्रलेखा पाटील म्हणाल्या.

त्या पुढे म्हणाल्या, प्रत्येक समाजाची ताकद ही महिला पान २ वर

## शेकापमध्ये इन्कमिंग सुरूच...



● शेतकरी कामगार पक्षाच्या रायगड जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांच्या कार्यप्रणालीवर खुश होऊन नांदगाव-मुरुड येथील नागेश्वर वाडी शिंदे गटाच्या दोन सदस्यांसह अनेक आदिवासी बंधू-भगिनींनी सोमवारी (दि. ७) पक्षप्रवेश केला. यावेळी पक्षाचे सरचिटणीस माजी आ. जयंत पाटील आणि माजी जि.प. अध्यक्षा तथा अलिबाग अर्बन बँकेच्या चेअरमन सुप्रिया पाटील यांनी सर्व प्रवेशकर्त्यांचे स्वागत केले.

## हर्षवर्धन पाटलांच्या हाती तुतारी

। इंदापूर । प्रतिनिधी ।

इंदापुरातील भाजपचे वरिष्ठ नेते आणि माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी अखेर भाजपला रामराम ठोकत सोमवारी (दि. ७) शरद पवार गटात प्रवेश केला आहे. भाजपसाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. हर्षवर्धन पाटील यांनी हाती तुतारी घेतल्याने इंदापुरात भाजपला मोठे खिंडार पडले आहे. इंदापूरमध्ये शरद पवार गटाची जाहीर सभा पार पडली. या सभेत हर्षवर्धन पाटील, त्यांची कन्या अंकिता पाटील यांनी पवार गटात जाहीरपणे पक्षप्रवेश केला. या कार्यक्रमाला पक्षप्रमुख शरद पवार, खा. अमोल कोल्हे, धैर्यशील मोहिते, माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील हे उपस्थित होते.

## दुबार, बोगस मतदार नोंदणी रद्द करा

- न्यायालयाचे तहसीलदारांना तातडीचे आदेश
- बाळाराम पाटील यांच्या लढ्याला मोठे यश

। पनवेल । प्रतिनिधी ।

१८८ पनवेल विधानसभा मतदारसंघातील प्रसिद्ध मतदार यादीमध्ये ८५ हजारांहून अधिक नावे दुबार आणि बोगस असल्याचे शेतकरी कामागर पक्षाचे माजी आमदार बाळाराम पाटील यांनी निवडणूक आयोगाच्या लक्षात आणून दिले होते. सदरहू नावे वगळण्याच्या कामात निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून असमर्थता व्यक्त होण्याची शक्यता लक्षात घेऊन बाळाराम पाटील यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. या याचिकेवर सोमवारी (दि. ७) सुनावणी पार पडली. दरम्यान, उच्च न्यायालयाने पुढील १५ दिवसांच्या आत दुबार आणि बोगस मतदार नोंदणी रद्द करा, असे आदेश पनवेलच्या तहसीलदारांना दिले आहेत.



याबाबत बाळाराम पाटील यांनी ही बाब पनवेल तहसील यांच्या निदर्शनास आणून दिली होती; परंतु त्यावेळेस तहसीलदारांनी याबाबत आपण असमर्थ असल्याचे सांगितले होते. असे झाल्यानंतर बाळाराम पाटील यांनी प्रथम याबाबत पत्रकार परिषद घेतली आणि जनजागृती केली. त्यानंतर त्याने मुंबई उच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला होता. त्यानंतर उच्च न्यायालयाने याबाबत आदेश पारित केले.

तूर्तास १८८ पनवेल मतदारसंघात २५,८५५ मतदारांची दुबार नोंदणी झालेली आहे. १५०- ऐरोली मतदारसंघातील १६,०९६ नावे, १९०- उरण मतदारसंघातील २७,२७५ नावे आणि १५१- बेलापूर मतदारसंघातील १५,३९७ नावे पनवेल मतदारसंघात अंतर्भूत झालेली आहेत. याव्यतिरिक्त ५८८ नावांचा कन्नड अथवा अन्य दक्षिण भारतीय भाषांमध्ये पत्ता नमूद आहे, तसेच संपूर्ण नावही नमूद नाही. या सर्व नावांना मतदारयादीतून वगळण्यात यावे, अशी मागणी बाळाराम पाटील यांनी न्यायालयाकडे केली होती.

### विमानतळ सुरू होण्याआधी नामकरणाची प्रक्रिया मार्गी लागणार

# दिबांच्या नावासाठी सरकार सकारात्मक

## केंद्रीय मंत्री किंजरापू राम मोहन नायडू यांची माहिती

। उरण । वार्ताहर ।

दिबांच्या आणि आपल्या संघर्षामुळे नामकरण लढ्याने एक वेगळी उंची गाठली आहे. या संघर्षाचा आणि आंदोलनाचा सन्मान करीत सरकार नामकरणाची प्रक्रिया पूर्ण करीत लवकरच नवी मुंबई विमानतळास दि.बा. पाटील यांचे नाव जाहीर करेल, अशी स्पष्ट भूमिका केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापू राम मोहन नायडू यांनी सोमवारी (दि. ७) नवी दिल्ली येथे जाहीर केली.

केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने नामकरणासंदर्भात लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीबरोबर आयोजित केलेल्या बैठकीत नायडू बोलत होते. नामकरणाचा पाठपुरावा करण्यासाठी तसेच या संदर्भातील सद्यःस्थिती जाणून घेण्यासाठी कृती समितीने मागणी केल्याप्रमाणे आजची बैठक नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी समितीशी बोलताना केंद्रीय मंत्री श्री. नायडू यांनी सुरुवातीलाच स्पष्ट केले की, दिबांव्यतिरिक्त इतर कोणाच्याही नावाचा प्रस्ताव आमच्या मंत्रालयाला



आलेला नाही. निवडणुका आणि राजकारण यांच्यापेक्षा दिबांचे नाव फार मोठे आहे. त्यांच्या नावासाठी कोणाचा अडथळाही नाही, सरकार दिबांच्या संघर्षाचा सन्मान करते. त्यांच्या नावासाठी आपण केलेल्या संघर्षाच्या आपल्या भावनाही आम्ही जाणतो. दिबांच्या आणि आपल्या संघर्षांचा सन्मान करीत आम्ही लवकरच दिबांचे नाव विमानतळाला जाहीर करू. राज्य सरकारने पाठवलेला नामकरणाचा प्रस्ताव प्रक्रियेचा भाग म्हणून मंजुरीस पाठवला आहे. याच प्रक्रियेचा भाग म्हणून पीएमओ आणि कॅबिनेटकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन देत मंत्रीमहोदयांनी विमानतळ सुरू होण्याआधी नामकरणाची सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून दिबांचे नाव जाहीर करण्यास आम्हाला आनंद वाटेल, असे यावेळी अधोरेखित केले.

याप्रसंगी झालेल्या चर्चेत राज्य मुरलीधर मोहोळ, माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील, राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, खा. श्रीरंग बारणे, समितीच्या वतीने अध्यक्ष दशरथ पाटील, आ. राजू पाटील, भूषण पाटील, जे.डी. तांडेल, संतोष केणे आदी मान्यवरांनी सहभाग घेतला होता. बैठकीसाठी अतुल दिबा पाटील, जे.एम. म्हात्रे, राजेश गायकर, विनोद म्हात्रे, दीपक पाटील, शरद म्हात्रे, सुशांत पाटील आणि केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्रालयाचे सचिव विमलूमंग वुलनाम आणि निर्देशक नयोनिका दत्ता आदी उपस्थित होते.

# आंतरराज्य टोळीला ठोकल्या बेड्या

## पनवेलसह नवी मुंबई व दिल्ली परिसरात गुन्हे

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेलसह नवी मुंबई व दिल्ली परिसरात गंभीर गुन्हे करून धुमाकूळ घालणाऱ्या आंतरराज्यीय सराईत टोळीला मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखेने गजाआड करून त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात लाखो रुपये किमतीचा ऐवज हस्तगत केला आहे.



दोन अज्ञात इसमांनी महिलेच्या गळ्यातील १८ ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र जबरीने हिसकावून काळ्या रंगाची केटीएम मोटारसायकलवरुन पळून गेल्याची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. त्याचप्रमाणे सीबीडी, खारघर, पनवेल शहर, कळंबोली, नेरूळ, वाशी, सानपाडा व कामोठे परिसरातदेखील अशा प्रकारचे गुन्हे दाखल करण्यात आलेले होते. याबाबतच्या तक्रारी संबंधित पोलीस ठाण्यात दाखल होताच पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, पोलीस सह. आयुक्त संजय ऐनपुरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) दिपक बाकोरे, पोलीस उपायुक्त अमित काळे आदींनी नवी पान २ वर

# उरणमधील रस्त्यांची दुरवस्था



। चिरनेर । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील खोपटा गावाजवळील व खोपटा पुलाजवळही रस्त्याची दयनिय अवस्था झाली आहे. उन्हाळ्यातच या रस्त्याला मोठमोठे खड्डे पडले होते. त्यावेळी या रस्त्यावर खडीकरण करण्यात आले होते. मात्र, पावसाळ्यात या रस्त्यावर खड्डे पडले असून, खड्ड्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. याचा फटका नागरिक आणि वाहन चालकांना बसत आहे. द्रोणागिरी नोडमधील नवघर ते खोपटेदरम्यानच्या मार्गाला भेंडखळ पेट्रोल पंप, खोपटे गाव आणि खोपटा पूल, चारफाटा आदी ठिकाणी मोठ मोठे खड्डे पडले आहेत.

या मार्गावरून सातत्याने अवजड वाहने ये-जा करीत आहेत. या भल्या मोठ्या खड्ड्यात कंटेनर कोसळून अपघात होण्याची शक्यता आहे. याच परिसरात यापूर्वी दुचाकी तसेच एसटी बसला अपघात झाल्याच्या घटना घडल्या आहेत. अशाच प्रकारचे खड्डे नवघर उड्डाण पुलावरही पडले आहेत. या पुलावरून प्रवासी वाहने व विद्यार्थी प्रवास करीत आहेत. त्यातच गेल्या दोन दिवसांपासून उरण परिसरातील पाऊस थांबला आहे. त्यामुळे रस्ते कोरडे झाले आहेत. परिणामी, खोपटा गावानजीक द.पी. पाडा ते धसा खोशी मार्गांवर, द्रोणागिरी व उरण-पनवेल मार्गावरील खड्डे बुजविण्यासाठी वापरण्यात आलेल्या खडीमुळे धूळ निर्माण होऊ लागल्याने प्रवासी आणि नागरिकांना धुळीचा सामना करावा लावत आहे. त्यामुळे नागरिक आणि प्रवासी त्रस्त झाले आहेत.

उरण-पनवेल मार्गावरील वाहनांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. सातत्याने सुरू असलेल्या वाहनांमुळे पावसाळ्यात रस्त्यावर पडलेले खड्डे बुजविण्यासाठी टाकण्यात आलेली खडी बाहेर पडू लागली आहे. त्यातून धूळ तयार होत आहे. ही धूळ वाहनांमुळे वातावरणात पसरू लागली आहे. या धुळीमुळे समोरचे वाहन आणि व्यक्ती दिसत नाही. या परिसरात उघड्यावर काम करणाऱ्या मजूरांच्या व वाहन चालकांच्या पोटात दररोज मुठभर धुरळा जात असल्याची शक्यता पर्यावरणप्रेमींकडून व्यक्त केली जात आहे. तसेच त्यामुळे नागरिकांना श्वसनाचे आजारही होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मार्गावरील ही धूळ कमी करण्यासाठी सिडको तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने योग्य ती उपाययोजना करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अनंत ठाकूर यांनी केली आहे.

# नागाव कवळेपाडामध्ये शिवकालीन शस्त्रप्रदर्शन

## नवतरूण नवरात्रौत्सव मंडळाचा स्तुत्य उपक्रम

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील नागाव कवळेपाडा येथे नवतरूण नवरात्रौत्सव मंडळाच्या स्तुत्य उपक्रमाने शिवकालीन शस्त्रप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. साळाव येथील शिवमर्दानी आखाड्याचे सोमवारी (दि. ७) सकाळी पसज्ञ ते रात्री आठदरम्यान शिवकालीन शस्त्रप्रदर्शन ठेवले होते.

या प्रदर्शनाच्या माध्यमातून इतिहास जिवंत ठेवण्याचे कार्य नागाव कवळेपाडा येथील नवतरूण नवरात्रौत्सव मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र नागलेकर, उपाध्यक्ष दिपक वर्तक, सचिव राजेंद्र नाईक, खजिनदार समीर नाईक व सर्व सभासद यांनी केले. या प्रदर्शनाचा शुभारंभ नागाव संचालक मंडळ हायस्कूलचे कार्याध्यक्ष एम.एम. पाटील, तसेच नागाव ग्रा.पं. उपसरपंच तथा नवतरूण नवरौत्सव मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र नागलेकर, ग्रा.पं. सदस्या प्रिया काठे, वीणा पिंपळे, रोहिणी म्हात्रे, निकिता पाडेकर, लीना घरत तसेच परेश ठाकूर यांची उपस्थिती होती.

या शस्त्र प्रदर्शनास नागाव सरपंच हर्षदा मयेकर यांनीसुद्धा भेट दिली. हे प्रदर्शन पाहण्याचा लाभ नागाव ग्रामस्थ तसेच पी.एन.पी. सायरन पुनावाला हायस्कूल नागाव, नागाव संचालक मंडळ हायस्कूल, राजिप शाळा नागावमधील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने घेतला. या शस्त्रप्रदर्शनास शिवमर्दानी आखाड्याचे व्यवस्थापक किशोर चवरकर, शुभम चवरकर व सहकारी यांनी उपस्थित मान्यवर, ग्रामस्थ व विद्यार्थ्यांना विविध शस्त्रांची माहिती दिली.

दरम्यान, नवतरुण नवरात्रौत्सव मंडळाच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे. यापुढेही असेच सामाजिक जनजागृतीविषयक कार्यक्रमांचे आयोजन करावे, असे आवाहन करण्यात आले.



अर्जदार तर्फे वकील
ॲड. सचिन दिनकर पाटील

### जाहीर नोटीस

नि. ७/ड

अलिबाग येथील मे. जिल्हा न्यायाधीश सो. यांच्या न्यायालयात
दिवाणी चौ. अर्ज क्र. १२८/२०२४
ने.ता. १९/११/२०२४

श्रीमती. प्रतिभा नरेश कडू, ... अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही ...सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की,

अर्जदार यांचे पती कै. नरेश गोविंद कडू हे दि. ०२/०७/२०२२ रोजी मयत झालेले असून त्यांना कु. मनिष नरेश कडू हा अपत्य आहे. सध्या तो अज्ञान असून अर्जदार हे कु. मनिष नरेश कडू याचे नैसर्गिक पालक आहेत हे घोषित करून मिळण्या करिता GAURDIANS AND WARDS ACT १८९० चे कलम ७ व २९ नुसार गार्डीअन दाखला मिळणे करिता अलिबाग येथील मा. प्रमुख जिल्हा न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदार यांच्या व्यतिरिक्त कु. मनिष नरेश कडू याच्या पालकत्वाबाबत कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत हजर राहून लेखी हरकत नोंदवावी.

वर नमुद कालावधीत योग्य ती हरकत न आल्यास अर्जदारांच्या या अर्जास कोणाचीही कसलीही हरकत नाही असे समजून मे. न्यायालय योग्य त्या पुराव्याअंती अर्जदारांचा अर्ज मंजुर करेल याची नोंद घ्यावी.

आज दि. ०५/१०/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाच्या शिक्यासह दिली.

सही/-
(कनिष्ठ लिपिक)
मा. जिल्हा न्यायालय
रायगड-अलिबाग

कोर्टाचा शिक्का

सही/-
(सहाय्यक अधिक्षक)
मा. जिल्हा न्यायालय
रायगड-अलिबाग

## पान १ वरून

# लाडक्या बहिणींची फसवणूक

असते. महिला घराबरोबरच गाव, समाज घडवू शकते. महिला सावित्रीची लेक बनून मुलीला शाळेत पाठवू शकते. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार चुलीपर्यंत पोहोचविण्याचे काम महिलाच करू शकतात. समाजात आमूलाग्र बदलासह सर्व घटकाला एकत्र आणण्याचे काम महिलाच करू शकतात. महिलेमध्ये प्रचंड मोठी शक्ती आहे. परंतु, आजही महिलांना दुय्यम दर्जाचे स्थान दिले जाते, ही शोकांतिका आहे.

आजची परिस्थिती गंभीर आहे. महिलांवर अत्याचार होत आहेत. बदलापूरसारख्या घटना घडत आहेत. त्यामुळे महिलांनी पुढाकार घेऊनच वाईट विकृतीविरोधात लढले पाहिजे. सर्व महिलांनी एक होऊन व्यसनमुक्तीचा संदेश पोहचविण्याचे काम केले पाहिजे. त्यासाठी सर्वांनी मजबूत होण्याची गरज आहे. अनेक संकटं उभी राहतील. मात्र त्या संकटावर मात करण्याची क्षमता निर्माण केली पाहिजे. तर समाजात बदल होऊन एक वेगळी क्रांती घडेल, असे चित्रलेखा पाटील यांनी सांगितले. भविष्यात या परिसरात महिलांना रोजगार मिळेल, यादृष्टीने कारखाना उभा केला जाणार आहे. बचतगट उभारून हजारो महिलांना रोजगाराचे दालन खुले केले करण्याचा प्रयत्न आहे. परंतु महिलांच्या रोजगाराविरोधात येथील स्थीनक प्रतिनिधीच पुढाकार घेत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. एका महिलेने पुढाकार घेऊन सुरु केलेला रोजगार बंद पाडण्याचा प्रयत्न लोकप्रतिनिधींनी सुरू केला आहे. तसेच रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा लौकिक जगात होत असताना या बँकेतील नोकर भरतीवर शिंदे गटाने स्थगिती आणून हजारो तरुणांचा रोजगार बुडविण्याचे काम केले आहे. त्यामुळे महिलांनी एकजूट होऊन लढले पाहिजे. आपल्या सर्वांच्या मदतीने ही स्थगिती उठवून तरुणांना रोजगार देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या भागातील पाण्यासह अनेक रखडलेले प्रश्न सोडविण्यात येतील, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली.

# आंतरराज्य टोळीला ठोकल्या बेड्या

मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये महिलांसंबंधीच्या गुन्ह्यांना प्रतिबंध करणे व रस्त्यावर घडणाऱ्या गुन्ह्यांवर प्राधान्य आणण्यासंदर्भात गुन्हे प्रकटीकरण शाखेला सूचना केल्या. त्यानुसार सहा.पोलीस आयुक्त गुन्हे शाखा अजय लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि मध्यवर्ती कक्ष सुनील शिंदे यांच्यासह सपोनि श्रीनिवास तुंगेनवार, सपोनि सतिश भोसले, सपोनि महेश जाधव, सपोनि निलम पचार, पोउपनि राहुल भदाणे, सहा. पोलीस उपनिरीक्षक मंगेश वाट, पोहवा शशिकांत शेंडगे, मपोहवा उर्मिला बोराडे, पोहवा अनिल यादव, पोहवा संजय राणे, पोहवा महेश पाटील, पोना सचिन टिके, पोना निलेश किंद्र, पोना राहूल वाघ, पोना अजय कदम, पोना महेश अहिरे, पोना सतिश चव्हाण, पोना नितिन परोडवाड आदींच्या पथकाने घटनास्थळी भेटी देऊन समांतर तपास करुन मोटारसायकल चोरी व चेन स्नॅचिंग उघडकीस आणण्याकरिता सुमारे एक आठवडा तांत्रिक तपास करून उलवे परिसरातून ४० ते ४५ सोसायट्या व गेस्ट हाऊस तपासून आरोपी सागर जुगेश मेहरा (२७), अभय सुनिलकुमार नैन (१९), शिखा सागर मेहरा (२७), अनुज विरसींग छारी (२४) आदींना वेगवेगळ्या ठिकाणावरुन ताब्यात घेतले. त्यांच्याकडून नवी मुंबई परिसरात जबरी चोरीचे ०७ गुन्हे, वाहन चोरीचे ०२ गुन्हे व दिल्ली येथील १ गुन्हा असे एकुण १० गुन्हे उघडकीस आले आहेत. तसेच आरोपी कमांक १ याच्याविरूध्द दिल्ली येथे ३७ गुन्हे दाखल असून, त्याच्याविरूध्द न्यायालयाने चार गुन्ह्यात जाहीरनामे प्रसिद्ध केले आहेत. या आरोपींकडून आतापर्यंत एक सोन्याचे मंगळसूत्र, तीन सोन्याच्या चेन, दोन तुटलेल्या सोन्याच्या चेनचे तुकडे असे एकूण ६६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, दोन केटीएम मोटारसायकल असा एकूण ७,७०,०००/- रूपये किमतीचा मुद्देमाल हसतगत करण्यात आला आहे.

### पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे लाडीवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली बिनशेती प्लॉट मिळकत तिचे मालकाकडून खरेदी करणेचे ठरविलेले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे लाडीवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती प्लॉट मिळकत**

| सर्व्हे नं./ हिस्सा नं. | प्लॉट नं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमिन मालक |
|---|---|---|---|---|
| १/२/ब | ३ | एकूण क्षेत्र ३-८४-०० पैकी यांचे मालकीचे क्षेत्र १-०१-०० | ७.६८ / १.९२ | सुरेश गणेशमल ओसवाल |
| | | एकूण क्षेत्र ३-८४-०० पैकी यांचे मालकीचे क्षेत्र १-०१-०० | ७.६८ / १.९२ | प्रविण रामभाऊ नाकरेकर |

या बिनशेती प्लॉट मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, बयाणापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा अगर फरोक्त वा इतर कोणत्याही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हाला ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत हरकत नोंदवावी. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील बिनशेती प्लॉट मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभांत सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येवून आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

कर्जत
दिनांक ०८/१०/२०२४

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को.ऑप. हौ. सोसायटी,
शॉप नं. १, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.: ८८८८०९८०८८/९५६१५७५६२६

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे बोरघर, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती श्री. रायमंड केकी पटेल यांच्या मालकी हक्कांच्या व ताबेकब्जात असून त्यांचे सदर मिळकतींचे मालकी हक्कांचे निर्वेधतेची पडताळणी आम्ही करीत आहोत,

**मिळकतीचे वर्णन**

| अनु. | मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| १. | बोरघर | २६९ | ०-२८-०० पो.ख. ०-०८-०० ०-३६-०० | ०.४७ |
| २. | बोरघर | २७० | ०-४२-०० पो.ख. ०-१८-०० ०-६०-०० | ०.७१ |
| ३. | बोरघर | २७५ | ०-०४-०० पो.ख. ०-०१-०० ०-०५-०० | ०.०८ |
| ४. | बोरघर | २७६ | ०-०७-०० पो.ख. ०-०२-०० ०-०९-०० | ०.१२ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकतीचे श्री. रायमंड केकी पटेल यांचे मालकी हक्क निर्वेध व निजोखमी असल्याचे गृहीत धरले जाईल व तसा दाखला दिला जाईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. ०८/१०/२०२४

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली मिळकत ही आमचे आशिल यांचेसाठी श्री. प्रभाकर नामदेव मापगावकर आणि श्री. प्रमोद नामदेव मापगावकर रा. मु. पो. मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीची असुन प्रत्यक्ष ताबे कब्जा वहीवाटीत आहे. सदर मिळकतीचे विद्यमान मालक म्हणुन त्यांस संबोधण्यात येईल तसेच सदर मिळकतीचे संपुर्ण मालकी हक्कदार, वहीवाटदार व कब्जेदार म्हणुन त्यांचेच नाव सदर मिळकतीस असेल. सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत कोणाचीही कसलीही हरकत असल्यात त्याची खातरजमा करणे कामी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|
| ८३ | ०-४६-०० ०.०४.६० एकुण क्षेत्र ०.५०.६० | २.६२ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, मृत्युपत्र, विक्रीचा करार, साठेकरार, पोटगी चार्ज, ताबा, वहीवाट, इजमेंट, बोजा तारण, वारस ट्रस्ट, कुळहक्क, कोणत्याही बँक कर्जाचा बोजा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १५ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे लेखी कळवावे. तशी कोणत्याही प्रकारची हरकत व तक्रार मुदतीत आमच्याकडे न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही असे मानण्यात येईल. मागाहुन आलेल्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे सर्वांस कळावे.

दिनांकः- ०८/१०/२०२४
ठिकाण :- अलिबाग

सही/-
**ॲड.रसिका सुचित म्हात्रे**
मु. पो. थळ,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९६३७१६१४४६

**महाराष्ट्र शासन**
**सहकार विभाग**
**सहायक निबंधक सहकारी संस्था अलिबाग कार्यालय**
ब्राह्मण उत्कर्ष मंडळ इमारत, पहिला मजला, ब्राह्मण आळी,
पो.ता. अलिबाग जि. रायगड, पिन कोड ४०२२०१
Email ID : aresalibag@gmail.com

**सहायक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग यांचे समोर,**

अर्ज क्रमांक ६९/२०२४
दिनांक- ०७/१०/२०२४

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, अलिबाग
तर्फे श्री लंकेश भगवान नागांवकर तालुका निरीक्षक ... अर्जदार
विरूद्ध
१. श्री.मनोज सुर्यकांत लाखे
पत्ता :- कृष्णधाम को ऑप हौसींग सोसा.चेंढरे ता.अलिबाग, जि.रायगड
२. सौ.रोहिणी मनोज लाखे -जाब देणार
पत्ता :- कृष्णधाम को ऑप हौसींग सोसा.चेंढरे ता.अलिबाग, जि.रायगड
३. श्री.प्रमोद नामदेव घासे
पत्ता :- बाफनाबाग, चेंढरे हॉटेल बिग स्प्लश मागे, ता.अलिबाग रायगड
४. श्री.वैभव रमाकांत पाटील
पत्ताः- मु.मोदीवाडा, मारूतीनाका बाजारपेठ ता.अलिबाग जि.रायगड

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम चे कलम १०१ आणि नियम ८६ अन्वये वसुलीस प्राप्त रक्कम रु १३,१८,२२९/-साठीचा अर्ज.

ज्या अर्थी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, अलिबाग तर्फे श्री लंकेश भगवान नागांवकर तालुका निरीक्षक, यांनी दिनांक २९/०७/२०२४ रोजी तुमचे विरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळण्याबाबत रितसर अर्ज या प्राधिकरणासमोर केलेला आहे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ८६ ब च्या तरतुदीस अनुसरुन अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी सदर अर्जामध्ये तुम्हा जाब देणार यांचे विरुद्ध रक्कम रुपये १३,१८,२२९/ (अक्षरी रुपये तेरा लाख अठरा हजार दोनशे एकोणतीस मात्र) चे वसुली प्रमाणपत्र मिळावे म्हणुन विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी नियमाचे नियम ८६ ब नुसार सर्व प्रतिवादीना नोटीस दिनांक ३०/०७/२०२४, रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पद्धतीने नोटीस निर्गमित करणेत आली होती. जी प्रतिवादी क्रमांक १ व २ यांना बजाविली गेली नाही. तसेच दिनांक २३/०८/२०२४, रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पद्धतीने दुसरी नोटीस निर्गमित करणेत आली होती. जी प्रतिवादी क्रमांक १ व २ यांना बजाविली गेली नाही. त्यांमुळे अर्जदाराने जाहीर नोटिस देणेची विनंती केली. त्यानुसार प्रतिवादी यांना जाहीर नोटीस देणेत येते की, दिनांक २३/१०/२०२४ रोजी दिवसाचे सकाळी १०.०० वा सहायक निबंधक, सहकारी संस्था अलिबाग यांचे कार्यालय, ब्राह्मण उत्कर्ष मंडळ इमारत, पहिला मजला, ब्राह्मण आळी, पो.ता. अलिबाग जि. रायगड. पिन कोड ४०२२०१ या कार्यालयात तुम्ही स्वतः हजर राहावे व अर्जदार संस्थेने केलेले मागणीबाबत बचाव करण्याची परवानगी घ्यावी किंवा तसा अर्ज शपथपत्र नोटीस जाहीर केलेचे दिवसापासुन १० दिवसाच्या आत या प्राधिकरणासमोर सादर करावे. या कामी तुम्ही गैरहजर राहिलेस किंवा बचाव करणेचा अर्ज/शपथपत्र मुदतीत दाखल न केलेस, अर्जदाराने अर्जात केलेली अभिकथने आपण स्विकारली आहेत असे गृहीत धरून, अर्जाची चौकशी करुन, अर्ज नियम ८६ क अन्वये एकतर्फी निकालात काढणेत येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक ०७/१०/२०२४

सही/-
**(श्रीकांत पाटील)**
**सहायक निबंधक**
**सहकारी संस्था अलिबाग**

अर्जदारातर्फे वकिल :- ॲड. सारिका भास्कर मुने

### जाहिर नोटीस

कर्जत येथील मो. दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दिवाणी चौकशी अर्ज १०९/२०२४
निशाणी क्र. ७/ड ने.ता. २०/११/२०२४

१. श्री. जसमीत सिंग, वय ४६ वर्षे,
धंदा नोकरी,
S/o श्री. गुरक्रिपाल सिंग
२. श्री. गुरक्रिपाल सिंग, वय सु. ८० वर्षे,
दोघेही रा. ४१४, फिफथ क्रॉस, ट्वेल्थ मेन रोड,
रमन रिसर्च इन्स्टिट्यूट जवळ,
सदाशिवनगर, बँगलोर (उत्तर) ... अर्जदार
बँगलोर, कर्नाटक, ५६००८०
आधार नं. ४५७२२५१८५३१८
३. श्रीमती. सुमीत सयगल, वय सु. ४७ वर्षे,
धंदा नोकरी,
D/o श्री. गुरक्रिपाल सिंग
रा. युनिट नं. ५ ए, २८,
हॅव्हिलाह एव्हून्यू, वॉशरूंगा,
न्यू साउथ वेल्स- २०७६,
ऑस्ट्रिलिया
करीता कुलमुखत्यारी म्हणून
अर्जदार क्र. १ श्री. जसमित सिंग
विरुध्द
कोणीही नाही ... सामनेवाला

या जाहिर नोटीसने तमाम लोकांस कळविण्यात येते की,

१. सदरहू मयत कै. कमलजीत कौर सयगल या अर्जदार क्र. १ व ३ यांची आई व अर्जदार क्र. २ यांची पत्नी आहे. मयत कै. कमलजीत कौर सयगल या मृत्यूपूर्वी ४१४, आरएमव्ही एक्सटेंशन, राजमहाल विलास एक्सटेंशन जवळ, सदाशिवनगर, बँगलोर (उत्तर) बँगलोर, कर्नाटक, या पत्त्यावर रहात होत्या. त्यानंतर दि. १२ फेब्रुवारी २००९ रोजी कै. कमलजीत कौर सयगल यांचा मृत्यू "WOCKHARDT HOSPITAL, BANGALORE-52" येथे झाला आहे.

२. सदर कै. कमलजीत कौर सयगल त्यांचे मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत. सदर अर्जदार यांची आई कै. कमलजीत कौर सयगल यांची मौजे नांगुर्ले येथे सामाईक जमिन स्थावर मिळकत आहे. सदर कै. कमलजीत कौर सयगळ यांचे असा वारस दाखला मिळणेसाठी अर्जदार यांनी बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट viii सन १८२७ प्रमाणे अर्ज दाखल केला आहे.

३. अर्जदार यांनी कै. कमलजीत कौर सयगल यांचे वारस म्हणून 'वारस दाखला' मिळण्याकरीता अर्ज दाखल केलेला आहे. कै. कमलजीत कौर सयगल यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांच्या हक्कांबद्दल कोणताही व्यक्तीगत हरकत करावयाची असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून योग्य त्या दस्तऐवजांसहित वर नमुद मा. न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहुन आपल्या हरकती घ्यावयाच्या आहेत.

याद्वारे असे जाहिर करण्यात येते की, वर नमुद कालावधी संपण्याच्या आगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मा. न्यायालय वरील अर्जदार व सामनेवाला यांचे हक्काबद्दल पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करील. कै. कमलजीत कौर सयगल यांचे वारस म्हणून अर्जदार यांचे नावे 'वारस दाखला' मंजूर करील.

सदरची नोटीस आज दिनांक ०७ माहे सन २०२४ रोजी आमच्या सहिने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
लिपिक
दिवाणी न्यायालय क स्तर
क.स्तर, कर्जत, जि. रायगड

शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय,
कर्जत, जि. रायगड

**महाराष्ट्र शासन**
**सहकार विभाग**
**सहायक निबंधक सहकारी संस्था अलिबाग कार्यालय**
ब्राह्मण उत्कर्ष मंडळ इमारत, पहिला मजला, ब्राह्मण आळी,
पो.ता. अलिबाग जि. रायगड, पिन कोड ४०२२०१
Email ID : aresalibag@gmail.com

**सहायक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग यांचे समोर,**

अर्ज क्रमांक ८६/२०२४
दिनांक- ०७/१०/२०२४

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, अलिबाग
तर्फे श्री लंकेश भगवान नागांवकर तालुका निरीक्षक ... अर्जदार
विरूद्ध
१. श्री. सुरेश जयवंत शीरसाठ
पत्ता :- मु. आर्य बंगला, वैभवनगर चेंढरे मारूती मंदिर शेजारी ता. अलिबाग, जि. रायगड
२. श्री. शुभम घनश्याम चव्हाण -जाब देणार
पत्ता :- खारलँड ऑफिस, नागडोंगरी ता. अलिबाग जि. रायगड
३. श्री. भूषण व्यंकट जाधव
पत्ता :- मु. चैतन्य हॉस्पिटल शेजारी मु.पो. ता. अलिबाग जि. रायगड

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम चे कलम १०१ आणि नियम ८६ अन्वये वसुलीस प्राप्त रक्कम रु २,५०,०५६/-साठीचा अर्ज.

ज्या अर्थी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, अलिबाग तर्फे श्री लंकेश भगवान नागांवकर तालुका निरीक्षक, यांनी दिनांक २९/०७/२०२४ रोजी तुमचे विरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळण्याबाबत रितसर अर्ज या प्राधिकरणासमोर केलेला आहे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ८६ ब च्या तरतुदीस अनुसरुन अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी सदर अर्जामध्ये तुम्हा जाब देणार यांचे विरुद्ध रक्कम रुपये २,५०,०५६/ (अक्षरी रुपये दोन लाख पन्नास हजार छपन्न मात्र) चे वसुली प्रमाणपत्र मिळावे म्हणुन विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी नियमाचे नियम ८६ ब नुसार सर्व प्रतिवादीना नोटीस दिनांक ३०/०७/२०२४, रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पद्धतीने नोटीस निर्गमित करणेत आली होती. जी प्रतिवादी क्रमांक २ यांना बजाविली गेली नाही. तसेच दिनांक २३/०८/२०२४, रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पद्धतीने दुसरी नोटीस निर्गमित करणेत आली होती. जी प्रतिवादी क्रमांक २ यांना बजाविली गेली नाही. त्यांमुळे अर्जदाराने जाहीर नोटिस देणेची विनंती केली. त्यानुसार प्रतिवादी यांना जाहीर नोटीस देणेत येते की, दिनांक २३/१०/२०२४ रोजी दिवसाचे सकाळी १०.०० वा सहायक निबंधक, सहकारी संस्था अलिबाग यांचे कार्यालय, ब्राह्मण उत्कर्ष मंडळ इमारत, पहिला मजला, ब्राह्मण आळी, पो.ता. अलिबाग जि. रायगड. पिन कोड ४०२२०१ या कार्यालयात तुम्ही स्वतः हजर राहावे व अर्जदार संस्थेने केलेले मागणीबाबत बचाव करण्याची परवानगी घ्यावी किंवा तसा अर्ज शपथपत्र नोटीस जाहीर केलेचे दिवसापासुन १० दिवसाच्या आत या प्राधिकरणासमोर सादर करावे. या कामी तुम्ही गैरहजर राहिलेस किंवा बचाव करणेचा अर्ज/शपथपत्र मुदतीत दाखल न केलेस, अर्जदाराने अर्जात केलेली अभिकथने आपण स्विकारली आहेत असे गृहीत धरून, अर्जाची चौकशी करुन, अर्ज नियम ८६ क अन्वये एकतर्फी निकालात काढणेत येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक ०७/१०/२०२४

सही/-
**(श्रीकांत पाटील)**
सहायक निबंधक
सहकारी संस्था अलिबाग

**महाराष्ट्र शासन**
**सहकार विभाग**
**सहायक निबंधक सहकारी संस्था अलिबाग कार्यालय**
ब्राह्मण उत्कर्ष मंडळ इमारत, पहिला मजला, ब्राह्मण आळी,
पो.ता. अलिबाग जि. रायगड, पिन कोड ४०२२०१
Email ID : aresalibag@gmail.com

**सहायक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग यांचे समोर,**

अर्ज क्रमांक ६८/२०२४
दिनांक- ०७/१०/२०२४

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, अलिबाग
तर्फे श्री लंकेश भगवान नागांवकर तालुका निरीक्षक ... अर्जदार
विरूद्ध
१. सौ. रोहीणी मनोज लाखे
पत्ता :- कृष्णधाम को ऑप हौसींग सोसा, चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड
२. श्री मनोज सुर्यकांत लाखे -जाब देणार
पत्ता :- कृष्णधाम को ऑप हौसींग सोसा, चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड
३. श्री. पंकज प्रभाकर पाटील
पत्ता :- सोगाव पो. मापगांव ता. अलिबाग रायगड
४. श्री. वैभव रमाकांत पाटील
पत्ता :- मु. मोदीवाडा, मारुतीनाका बाजारपेठ ता. अलिबाग जि. रायगड

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम चे कलम १०१ आणि नियम ८६ अन्वये वसुलीस प्राप्त रक्कम रु १५,५४,९३०/-साठीचा अर्ज.

ज्या अर्थी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, अलिबाग तर्फे श्री लंकेश भगवान नागांवकर तालुका निरीक्षक, यांनी दिनांक २९/०७/२०२४ रोजी तुमचे विरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळण्याबाबत रितसर अर्ज या प्राधिकरणासमोर केलेला आहे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ८६ ब च्या तरतुदीस अनुसरुन अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी सदर अर्जामध्ये तुम्हा जाब देणार यांचे विरुद्ध रक्कम रुपये १५,५४,९३०/ (अक्षरी रुपये पंधरा लाख चोपन्न हजार नऊशे तीस मात्र) चे वसुली प्रमाणपत्र मिळावे म्हणुन विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी नियमाचे नियम ८६ ब नुसार सर्व प्रतिवादीना नोटीस दिनांक ३०/०७/२०२४, रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पद्धतीने नोटीस निर्गमित करणेत आली होती. जी प्रतिवादी क्रमांक १ व २ यांना बजाविली गेली नाही. तसेच दिनांक २३/०८/२०२४, रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पद्धतीने दुसरी नोटीस निर्गमित करणेत आली होती. जी प्रतिवादी क्रमांक १ व २ यांना बजाविली गेली नाही. त्यांमुळे अर्जदाराने जाहीर नोटिस देणेची विनंती केली. त्यानुसार प्रतिवादी यांना जाहीर नोटीस देणेत येते की, दिनांक २३/१०/२०२४ रोजी दिवसाचे सकाळी १०.०० वा सहायक निबंधक, सहकारी संस्था अलिबाग यांचे कार्यालय, ब्राह्मण उत्कर्ष मंडळ इमारत, पहिला मजला, ब्राह्मण आळी, पो. ता. अलिबाग जि. रायगड. पिन कोड ४०२२०१ या कार्यालयात तुम्ही स्वतः हजर राहावे व अर्जदार संस्थेने केलेले मागणीबाबत बचाव करण्याची परवानगी घ्यावी किंवा तसा अर्ज शपथपत्र नोटीस जाहीर केलेचे दिवसापासून १० दिवसाच्या आत या प्राधिकरणासमोर सादर करावे. या कामी तुम्ही गैरहजर राहिलेस किंवा बचाव करणेचा अर्ज/शपथपत्र मुदतीत दाखल न केलेस, अर्जदाराने अर्जात केलेली अभिकथने आपण स्विकारली आहेत असे गृहीत धरून, अर्जाची चौकशी करुन, अर्ज नियम ८६ क अन्वये एकतर्फी निकालात काढणेत येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक ०७/१०/२०२४

सही/-
**(श्रीकांत पाटील)**
सहायक निबंधक
सहकारी संस्था अलिबाग


सत्यमेव जयते
भारत सरकार
महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
महाराष्ट्र शासन
ऊर्जा विभाग
श्री. नरेंद्र मोदी
मा. प्रधानमंत्री
श्री. एकनाथ शिंदे
मा. मुख्यमंत्री
राज्यातील
२४२ शासकीय व सहकारी उपसा जलसिंचन
योजनांच्या (९०५ MW) सौर ऊर्जीकरण प्रकल्पांचे भूमिपूजन
आणि पायाभूत विद्युत सुविधांच्या रू. २७७३ कोटींच्या
सक्षमीकरण व विस्तारीकरण कामांचा शुभारंभ
राज्यातील उपसा जलसिंचन योजनांचे सौर ऊर्जीकरण
शासनाकडून ३३६६ कोटी रूपयांचे अनुदान
राज्यातील २४२ शासकीय व सहकारी उपसा जलसिंचन योजनांच्यां सौर ऊर्जीकरणातून ९०५ MW ची वीजनिर्मिती
सौर प्रकल्प उभारणीची कामे दोन वर्षात पुर्ण होणार
RDSS व AIIB निधीतून मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत पायाभूत विद्युत सुविधांचे सक्षमीकरण व विस्तारीकरण
पश्चिम महाराष्ट्र, कोकण व उत्तर महाराष्ट्रातील पायाभूत विद्युत सुविधा सक्षमीकरणाच्या रू. २७७३ कोटींच्या कामांचा प्रारंभ
१५० उपकेंद्रे व ३१३८ किलोमीटरची नवीन विद्युत वाहिनी उभारणी व ४३४१ एमव्हीए क्षमतावृध्दी
शुभहस्ते
मा.ना.श्री. एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री
मा.ना.श्री. देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री
मा.ना.श्री. अजित पवार
उपमुख्यमंत्री
प्रमुख उपस्थिती
मा.ना.श्री.चंद्रकांत पाटील
मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्य तथा पालकमंत्री, सोलापूर जिल्हा
मा.ना.कु. अदिती तटकरे
मंत्री, महिला व बाल विकास
मंगळवार दि. ०८ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी १२.३० वा.
स्थळ- होम मैदान, हरिभाई देवकरण प्रशाला समोर, सोलापूर
देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री
अजित पवार
उपमुख्यमंत्री


महाराष्ट्र शासन
नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री
महात्मा फुले जन आरोग्य योजना
पाच लाखांपर्यंत
मोफत उपचार...
योजनेअंतर्गत राज्यातील सर्व नागरिकांना उपचाराचा लाभ
उपचाराची खर्च मर्यादा प्रती कुटुंब प्रति वर्ष दीड लाखावरून पाच लाख.
योजनेतून (१ जुलै २०२२ ते ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत) १० लाख ७३ हजार रुग्णांनी घेतला लाभ, यापोटी ४३५६.१२ कोटीचा खर्च
आपलं सरकार
लाडकं सरकार
अजित पवार
उपमुख्यमंत्री
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री
देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री
/MahaDGIPR
mahasamvad.in
MAHARASHTRADGIPR
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

# ताराबाई- सार्थ निवड

साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. तारा भवाळकर यांची निवड हा एक सुखद धक्का म्हणावा लागेल. हे संमेलन देशाच्या राजधानीत भरायचे आहे. त्यामुळे तेथे भाजपला सोईस्कर व्यक्तीची निवड होऊन त्याचा राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न होईल असे अनेकांना वाटत होते. पण ताराबाईंची निवड करून साहित्य महामंडळाने अजूनही मराठी समाजातला विवेक जागा असल्याचे दाखवून दिले, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करायला हवे. ताराबाईंसारख्या पुरोगामी, निर्भीड आणि सजग लोकसंस्कृती अभ्यासकांशी सध्याच्या राजवटीचे जमेल असे नाही. पण बहुसंख्य मराठी रसिकांना त्यांच्या निवडीने आनंद झाला आहे. हे चित्र सध्याच्या वातावरणात आशादायी म्हणायला हवे. गेल्या काही वर्षांपासून साहित्य संमेलनांच्या अध्यक्षपदी काहीशा अज्ञात व्यक्तींची निवड होत चालली होती. म्हणजे, निवड झालेल्या लेखकाच्या चार पुस्तकांची नावे किंवा त्याने नेमके काय केले हे सांगता येऊ नये अशी अवस्था रसिकांवर ओढवत होती. ताराबाईंच्या निवडीने या रुढीला छेद दिला गेला हे बरे झाले. ताराबाईंचा जन्म पुण्याचा. त्यांचे लहानपण सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांच्या वाड्यात गेले. चारही वेदांचे मराठीत भाषांतर करणारे शास्त्रीबुवा पुराणमतवादी नव्हते. लहानपणी होळीच्या कार्यक्रमात सर्व मुलांबरोबर लहानग्या ताराबाईंनीही बोंब मारायला सुरूवात करताच त्यांच्या आईने हात उगारला. त्यावर चित्रावशास्त्री म्हणाले की मारू दे तिला बोंब. नाहीतरी आपल्याकडे स्त्रियांनाच बोंब मारावी लागते. चित्रावांच्या वाड्यात पहाटे काकड आरतीपासून ते रात्री भजनापर्यंत अखंड विविध धार्मिक विधी व गाणी याद्वारे त्यांना लोकसंस्कृतीचा पहिला परिचय झाला. पण या सर्वांकडे एकाच वेळी आस्थेने आणि तरीही चिकित्सकपणे पाहण्याची दृष्टी त्यांच्यात विकसित होत गेली. पुढच्या काळात आपल्या मध्यमवर्गीय परिसराबाहेर पडून भटक्या, आदिवासी, दलित, बहुजन समाजांमधील लोकपरंपरांचा अभ्यास व चिंतन त्यांनी केले. नव्हे तेच त्यांचे जणू जीवितकार्य झाले. त्याचा आज सन्मान होतो आहे ही आनंदाची बाब आहे.

### सीतेच्या दुःखाचे गाणे

ताराबाईंचे एसएससीनंतरचे सर्व शिक्षण कॉलेजात न जाता व बहिस्थ रीतीने झाले. आरंभी त्या शाळेत व नंतर महाविद्यालयात अध्यापक होत्या. आरंभी नाट्यक्षेत्राशीही त्या जोडलेल्या होत्या. नाटककार, दिग्दर्शक, नट अशा भूमिकांमधून त्या वावरल्या. त्यांनी कथालेखन तसेच विनोदी लेखनही केलेले आहे. मात्र त्यांचे नाव जोडले गेले आहे ते लोकसंस्कृतीच्या अभ्यासाशी. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर, दत्तो वामन पोतदार, दुर्गा भागवत, रा.चिं ढेरे यांच्यासारख्यांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष आशीर्वाद व मार्गदर्शन त्यांना लाभले. हा त्यांचा अभ्यास आजही चालू आहे. अगदी अलिकडे प्रसिद्ध झालेले सीतायन हे पुस्तक हा त्याचा लखलखीत पुरावा आहे. संपूर्ण भारतात लेखी व मौखिक परंपरेतील असंख्य रामायणे उपलब्ध आहेत. ही कथने रामाच्या कथेकडे वेगवेगळ्या दृष्टीने पाहतात. त्यातही गावखेड्यातील बायकांच्या ओव्या किंवा आदिवासी वा खेडुतांची पुराणे वा दैवतकथा यामध्ये सीतेच्या कथेकडे अधिक सहानुभूतीने व करुणेने पाहिले गेले आहे. रामाने सीतेला अग्निदिव्य करायला लावणे आणि नंतर गर्भवती असताना तिला पुन्हा वनवासात धाडणे याबाबत अशिक्षित समजल्या जाणाऱ्या पण खरे तर अत्यंत प्रगल्भ अशा खेडूत स्त्रियांनी तीव्र राग वा दुःख व्यक्त केले आहे. जात्यावरच्या ओव्या किंवा अन्य गीतांमधून ते व्यक्त झाले आहे. रामाविषयी जनतेत श्रध्दा आहेच. पण ती श्रध्दाही डोळस आहे. ''राम म्हणू राम, नाही सीतेच्या तोलाचा, हिरकणी सीतामाई, राम हलक्या दिलाचा'', असे स्पष्ट बजावणारी लोकपरंपरा हे महाराष्ट्राचे खरे वैभव आहे. या वैभवाचे दर्शन बाईंच्या पुस्तकात आपल्याला घडते. उत्तरेतील अडाणी गायपट्ट्यातल्या लोकांच्या नादाला लागून त्या वैभवाची माती करण्याचा चंग इथल्या मराठी मूर्खांनी बांधला आहे. या पार्श्वभूमीवर ताराबाईंची निवड होणे हे विशेष महत्वाचे ठरणार आहे.

### स्त्रीमुक्तीचा विचार

ताराबाईंनी सार्वजनिक जीवनात लक्ष्मण मानेंच्या चळवळीपासून ते अंधश्रध्दा निर्मूलन समितीपर्यंत अनेकांशी स्वतः ला जोडून घेतले. स्त्रीमुक्ती चळवळीशीही त्यांचे जवळचे नाते आहे. मात्र संघर्षासाठी संघर्ष किंवा विद्रोहासाठी विद्रोह ही त्यांची प्रवृत्ती नाही. समाजाच्या धार्मिक श्रद्धा त्या समजून घेऊ शकतात. त्याचा तिरस्कार किंवा अतिरेकी गौरव करण्याचे त्या टाळतात. या श्रध्दा वा परंपरांमधून प्रकट होणाऱ्या सामाजिक आशयाचा शोध घेण्याचा त्या प्रयत्न करतात. त्यामुळे ताराबाईंचे लेखन कर्कश होत नाही. जुने ते सर्व चांगले किंवा जुने ते सर्व नाकारा या दोन्ही मतांपासून त्या समान अंतर ठेवून राहतात. १९७५ हे आंतरराष्ट्रीय स्त्रीमुक्तीवर्ष म्हणून साजरे झाले. मात्र स्त्रीमुक्तीचा विचार आपल्या परंपरेत खूप पूर्वीपासून आहे, असे मत त्यांनी मांडले. विठ्ठलाकडे आई, बाप, भाऊ या नात्यांपलिकडे जाऊन सखा वा प्रियकर म्हणून पाहणाऱ्या संत स्त्रियांच्या रचनांची महाराष्ट्राला त्यांनी ओळख करून दिली. स्त्रीमुक्तीचा आत्मस्वर हे पुस्तक त्यातून सिद्ध झाले. आपल्याकडील साहित्यात पुरुषांच्या आवाजाचे वर्चस्व आहे. स्त्रियांच्या व्यक्तिरेखाही पुरुषांच्या दृष्टिकोनातून येतात. त्यामुळे स्त्रियांचा खरा आवाज हा लोकसंस्कृतीतील ओव्या, गाणी, भारुडे, अभंग इत्यादींमध्ये आढळतो असे त्यांचे प्रतिपादन आहे. यासाठी त्यांनी महाराष्ट्रच नव्हे तर देशभरातल्या विविध प्रांतांतील परंपरांचा अभ्यास केला. तेलुगु, कन्नड या भाषांमधून थेट काही भाषांतरे केली. आरंभी अगदी पीटी शिक्षिका म्हणूनही काम केलेल्या ताराबाईंना जीवनाचे सर्वच रंग आपलेसे वाटतात. हरिवंशराय बच्चन यांच्या मधुशाला या प्रसिध्द हिंदी कवितासंग्रहाचे मराठी भाषांतर त्यांनी केले यक्षगान आणि मराठी नाट्यपरंपरा, लोकरंगभूमी या पुस्तकांमधून त्यांनी नाटक या प्रकाराचा विविधांगी शोध घेतला. काही वर्षांपूर्वी अलिबागजवळ आवासला झालेल्या कोकण मराठी महिला साहित्य संमेलनाच्या त्या अध्यक्ष होत्या. आता त्या दिल्लीत दिसतील. दिल्लीतील संमेलन हे ९८ वे आहे. त्याच्या अध्यक्षीणबाई ८५ वर्षांच्या असतील. पण आपला खणखणीत आवाज आणि विचार याद्वारे त्या जवळपास शतकी परंपरेला नव्याशी जोडून घेतील यात शंका नाही. त्यांना व संमेलनाला शुभेच्छा.

विचार

# झारखंडमध्ये कुर्मी मतांवर सर्वांचा डोळा

***झारखंडमध्ये इंडिया आघाडीपुढे सत्ता टिकवण्याचे आव्हान आहे, तर राष्ट्रीय लोकशाही आघाडीला कोणत्याही परिस्थितीत सत्तेत यायचे आहे. भाजपने येथे अजित पवार गटाचा एक आमदार तसेच झारखंड मुक्ती मोर्चाचे माजी मुख्यमंत्री चंपाई सोरेन यांना गळाला लावले असले, तरी लढाई सोपी नाही. येथे कुर्मी मतांवर सर्वच पक्षांचा डोळा असून त्यांच्या निर्णायक मतांवर सत्तेची चावी कुणाकडे जाईल, हे ठरणार आहे.***



झारखंडमधील विधानसभेच्या ८१ जागांसाठी पुढील महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात निवडणूक होण्याची शक्यता आहे. त्या दृष्टीने इंडिया आघाडी आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडी कामाला लागली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे झारखंड दौरे वाढले आहेत. 'मनी लाँड्रिंग' आणि जमीन घोटाळ्याच्या आरोपाखाली मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना तुरुंगात धाडण्यात आले; परंतु तपासी यंत्रणांना कोणताही आरोप सिद्ध करता आला नाही; उलट, या यंत्रणांवर सर्वोच्च न्यायालयाने ताशेरे ओढले. तुरुंगातून बाहेर आल्यानंतर हेमंत सोरेन यांची पुन्हा मुख्यमंत्रिपदी वर्णी लावण्यात आली. त्यांच्या गैरहजेरीत कुटुंबीयांना डावलून चंपाई सोरेन यांच्याकडे मुख्यमंत्रिपद सोपवण्यात आले. निवडणूक होईपर्यंत तरी मुख्यमंत्री राहता येईल, अशा अपेक्षेत असलेल्या चंपाई यांचे मुख्यमंत्रिपद काढून घेण्यात आले. त्यामुळे ते नाराज झाले. त्यांच्या नाराजीला भाजपने खतपाणी घातले. त्यांच्यासह सहा-सात आमदार गळाला लागतील, अशी भाजपची अपेक्षा होती; परंतु तसे झाले नाही. चंपाई यांना एकटे पाडण्यात हेमंत सोरेन यशस्वी झाले. त्यांच्या प्रवेशामुळे भाजपमध्ये नाराजी वाढली. बाबुलाल मरांडी, अर्जुन मुंडा हे नेते नाराज झाले. भाजपच्या अभियानात चंपाई यांचा फोटो गायब झाला. त्यांचा 'खेला' केल्यासारखी स्थिती आहे. अशा परिस्थितीत झारखंड विधानसभेच्या निवडणुकीसाठी मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. 'एनडीए' आणि इंडिया आघाडीच्या नेत्यांनी जोरात तयारी सुरू केली आहे.

भाजपने झारखंडमध्ये 'ऑल झारखंड स्टुडंट्स युनियन' म्हणजेच 'एजेएसयू' आणि संयुक्त जनता दलासोबत आघाडी करून निवडणूक लढवणार असल्याचे जाहीर केले आहे. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. सूत्रांकडून मिळालेल्या वृत्तानुसार 'एजेएसयू' या निवडणुकीत उत्स्फूर्त सहभाग घेणार असून भाजप बॅकफूटवर असल्याचे वृत्त आहे. भाजपला बॅकफूटवर येण्यास का भाग पाडले जात आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. सरमा यांनी सांगितले की भाजप झारखंडमधील आगामी विधानसभा निवडणुका 'एजेएसयू' आणि संयुक्त जनता दल यांच्यासोबत युती करून लढवेल. मित्रपक्षांशी ९९ टक्के जागा वाटपासाठी करार झाला असून उर्वरित एक किंवा दोन जागांबाबत चर्चा सुरू आहे. 'एनडीए'मध्ये सामायिकरणाचा फॉर्म्युला जवळजवळ निश्चित झाला आहे असून 'एजेएसयू'ला मोठा वाटा मिळू शकतो तर संयुक्त जनता दलाच्या वाट्याला एक किंवा दोन जागा येऊ शकतात. भाजप 'एजेएसयू'ला ६ ते ९ जागा देण्याच्या बाजूने आहे; परंतु 'एजेएसयू'चा दावा १३ ते १५ जागांसाठी आहे. असे असले, तरी 'एजेएसयू' ला जवळपास १० किंवा ११ जागांवर निवडणूक लढवण्याची संधी मिळू शकते. भाजप ६८ किंवा ६९ जागांवर, 'एजेएसयू' ११ जागांवर, संयुक्त जनता दल दोन जागांवर आणि लोकजनशक्ती पक्ष एका जागेवर निवडणूक लढवू शकतो.

दिल्लीत झारखंड निवडणुकीच्या जागावाटपाबाबत चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या आहेत. 'एनडीए'मधील मित्रपक्षांची संख्या वाढत असल्याने येथे सर्वच पक्षांच्या जागा कमी होऊ शकतात. भाजपला हा त्याग करावा लागेल. 'एजेएसयू'चे सुदेश महतो यांनी कोणत्याही परिस्थितीत 'एनडीए'चा भाग रहावे, अशी भाजपची इच्छा आहे. कारण २०१९ च्या झारखंड विधानसभा निवडणुकीत भाजप आणि 'एजेएसयू'दरम्यान जागावाटपाबाबत चर्चा होऊ शकली नव्हती. तेव्हा 'एजेएसयू'ने भाजपपासून वेगळे होऊन स्वबळावर निवडणूक लढवली. 'एजेएसयू'ने ५२ जागांवर उमेदवार उभे केले होते; परंतु अहंकाराच्या या लढाईमध्ये दोन्ही पक्षांचे नुकसान झाले आणि 'एनडीए'ला सत्तेतून बाहेर पडावे लागले. ८१ जागांच्या विधानसभेत भाजपला केवळ २८ जागा जिंकता आल्या तर 'एजेएसयू'ला दोन जागा मिळाल्या. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजप, 'एजेएसयू' आणि लोकजनशक्ती पक्षाने एकत्रितपणे निवडणूक लढवली होती. त्यात 'एनडीए' ने ४२ जागा जिंकल्या होत्या. त्यापैकी भाजप ३७ तर 'एजेएसयू' पाच जागा जिंकण्यात यशस्वी ठरला होता. त्यावेळी भाजपने ७२, 'एजेएसयू'ने आठ तर लोकजनशक्ती पक्षाने एका जागेवर निवडणूक लढवली होती.

सुदेश महतो कुर्मी जातीतून येतात. झारखंडमध्ये कुर्मी मतांचे समीकरण महत्त्वाचे असल्याने भाजपसाठी 'एजेएसयू' महत्त्वाची असल्याचे राजकीय जाणकारांचे म्हणणे आहे. संयुक्त जनता दलाचे नेते नितीशकुमार हेही याच जातीतून आले आहेत; पण झारखंडमध्ये या पक्षाला तेवढा मोठा जनाधार नाही. अशा स्थितीत संयुक्त जनता दल एक-दोन जागांवर आनंद साजरा करू शकतो. सरयू राय यांची पूर्व सिंगभूम किंवा पश्चिम सिंगभूम ही जागा संयुक्त जनता दलाच्या खात्यात जाऊ शकते. झारखंडमध्ये कुर्मी मतदार निर्णायक भूमिका बजावतात. त्यामुळे सर्व पक्ष कुर्मींवर लक्ष केंद्रित करत आहेत. काँग्रेसने केशव महातो कमलेश यांना पक्षाचे प्रदेशाध्यक्ष केले आहे. त्याचबरोबर कुर्मी मतांवर झारखंड मुक्ती मोर्चाची आधीच चांगली पकड आहे. अशा परिस्थितीत भाजपने 'एजेएसयू'सोबत निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. झारखंडमध्ये २६ टक्के आदिवासी मतांनंतर, कुर्मी मतदारांची संख्या सर्वाधिक आहे. ती एकूण मतांच्या सुमारे १६ टक्के आहे. गिरिडीह, धनबाद, रांची हजारीबाग आणि जमशेदपूर या जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक लोकसंख्या आहे.

सुदेश महतो यांचे प्रभाव क्षेत्र रांचीच्या आसपासच्या भागात आहे; पण ते भाजपसाठी महत्त्वाचे आहेत. कारण आता 'जेबीकेएसएस' या पक्षानेही आपली उपस्थिती नोंदवली आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीपर्यंत फक्त सुदेश महतो यांचा 'एजेएसयू' पक्ष कुर्मी मतांवर दावा करताना दिसत होता; पण २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत झारखंडी भाषा-खतीयन संघर्ष समिती म्हणजेच जयराम महतो यांच्या 'जेबीकेएसएस'ने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. 'एजेएसयू' आणि 'जेबीकेएसएस' गिरीडीह, धनबाद, रांची हजारीबाग आणि जमशेदपूर यासारख्या जिल्ह्यांवर लक्ष केंद्रित करतात. येथे सरासरी १६ टक्के कुर्मी लोकसंख्या राहते. तथापि, 'एजेएसयू' किंवा 'जेबीकेएसएस'ला निवडणुकीतील मोठा घटक मानले जात नाही. झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते नेते निर्मल महतो यांनी 'एजेएसयू'ची स्थापना केली होती. ते दीर्घकाळ झारखंड मुक्ती मोर्चाचे सदस्य होते. 'एजेएसयू'मध्ये देखील अनेकदा फूट पडली.

सुदेश महतो २००० पासून 'एजेएसयू'चे नेतृत्व करत आहेत. २००७ मध्ये त्यांनी पक्षाची पुनर्रचना केली. काही अपवाद वगळता 'एजेएसयू' २००० पासून सतत 'एनडीए' सोबत आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत पक्षाला गिरिडीहची जागा जिंकण्यात यश आले. त्याच वेळी भाजप 'एजेएसयू'बद्दल जागरूक आहे. कारण महतो यांच्यासोबत राहिल्याने त्यांच्या म तांमध्ये घट होता कामा नये, यासाठी दक्ष रहावे लागणार आहे. हिमंता बिस्वा सरमा यांच्या म्हणण्यानुसार 'एनडीए'मध्ये झारखंडमधील जागावाटपाची चर्चा अंतिम टप्प्यात असून फक्त घोषणा बाकी आहे. याआधी महतो यांनी गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत या मुद्द्यावर बैठक घेऊन चर्चा केली. शहा यांची भेट घेण्यापूर्वी, महतो आणि सरमा यांनी जागावाटपाबाबत स्वतंत्र बैठक घेतली. सध्या झारखंडमध्ये एकूण २ कोटी ५९ लाख मतदार आहेत. त्यापैकी १ कोटी ३१ लाख पुरुष आणि १ कोटी २८ लाख महिला मतदार आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीसाठी २९ हजार ५६२ मतदान केंद्रे असतील. झारखंडमध्ये विधानसभेच्या एकूण ८१ जागा आहेत, त्यापैकी ४४ सर्वसाधारण, सात अनुसूचित जाती आणि २८ अनुसूचित जमातींसाठी राखीव आहेत.

आजकाल

# जग्गी वासुदेववर कारवाई आणि राज्यमाता

**सुरज सामंत**

नुकतेच मद्रास उच्च न्यायालयाने जग्गी वासुदेवला सुनावले, आणि आश्रमावर पोलिसांच्या धाडी सुद्धा पडल्या.

तर हा जग्गी वासुदेव मध्यन्तरी म्हणाला होता...

यशोदा मुलाच्या (कृष्णाच्या) फार प्रेमात होती. फक्त मुलगा म्हणून नव्हे तर 'त्यापेक्षा काही जास्तच'

तो लहान असताना ते अपत्य प्रेम होतं, पण जस जसा तो मोठा झाला (तो प्रचंड वेगाने मोठा झाला ) कुठलीही आई, अशा वाढीबरोबर मातृत्वाचा समतोल राखू शकत नाही.

त्यामुळे तो पाच सहा वर्षाचा झाल्यावर, तिचं मातृत्व कुठेतरी हरवलं आणि ती काहीशी त्याची प्रेमिका झाली.

यशोदेचं नातं कृष्णासोबत असं काही झालं की ती इतर गोपी प्रमाणेच 'रास' चा एक भाग झाली.

तिला राधा आवडेनाशी झाली. ती म्हणायची की राधा त्याच्या मानाने फार पुढारलेली (उपरोधिक) आहे.

आता आपण असल्या बाबा बुवांना आणि त्यांच्या वक्तव्यांना दोन पैशांची सुद्धा किंमत देत नाही हे निराळं ...

पण सतत दुखावल्या जाणाऱ्या 'धार्मिक भावना' हे ऐकून दुखावल्या की नाही?

या बाबाची अजून थोडी माहिती.

फोटो मध्ये दिसणाऱ्या बातमीला २५ वर्ष होऊन गेली. (फोटो कमेंट मध्ये)

हा जग्गी वासुदेव आता मोठा बाबा बनला आहे उर्फ सद्गुरू आणि जगभरात फिरून ज्ञान पेलत असतो. (अर्थातच अवैज्ञानिक)

बातमीनुसार, तक्रारकर्ता श्री. गंगन्ना यांनी म्हटले आहे की, त्याची मुलगी १५ जून १९९६ रोजी त्यांना शेवटची भेटली.

२३ जानेवारी १९९७ ला जग्गीकडून त्यांना मेसेज मिळाला की त्यांची मुलगी आता जिवंत राहिली नाही आणि तिच्या वडिलांनी थांबण्याची विनंती करून देखील जग्गीने वडील येण्याआधी मुलीच्या शरीराला अग्नी देऊन क्रियाकर्म करून टाकले.

गंगन्ना म्हणतात त्यांच्या कम्युनिटी मध्ये जाळण्याची प्रथा नाही तरीही तिला अग्नी का दिला ?

काही पुरावे मिळू नये म्हणून का ?

तिची हत्या आश्रमातल्या त्याच्या दुसऱ्या स्त्री बरोबरच्या संबंधाच्या प्रकरणातून झाली असावी....

जग्गी च्या प्रतिक्रियेमध्ये..... त्याच्या पत्नीने 'समाधी घेतली' असे म्हटले होते.

शिवाय या जग्गीच्या आश्रमाची, पर्यावरण खात्याच्या परवानगी ची अनेक विवादास्पद उदाहरणे आहेत.

आणि हा लोकांना आयुष्याचा अर्थ शिकवतो.

आज बरेच डिग्र्या घेतलेले, कलाकार, राजकारणी याच्या गोतावळ्यात असतात.

कमी अधिक फरकाने बऱ्याच बाबा बुवांची पार्श्वभूमी अशीच विवादास्पद असते.

पण हिंदु धार्मिक सरकार हवे तर असले बाबा बुवा हवेत ना....

आता हरियाणात निवडणुका आहेत तर त्या राम रहीम ला पुन्हा परोल वर सोडलंय.

गोबरपट्ट्यातल्या मंदिरात साईबाबा नाही चालणार म्हणत मूर्ती बाहेर काढली म्हणे....

आणि काही जणांना आश्चर्य सुद्धा वाटतंय.

त्यात विशेष काय?

एकच भाषा.. हिंदी पाहिजे म्हणणार,

एकच रंग, एकच पार्टी, एकच सण,

जे जे गोबरपट्ट्यात होतं ते ते राष्ट्रीय म्हटलं जाणार.

त्यामुळे, सबका नंबर आयेगा.

महाराष्ट्राला गोबरपट्टा बनवण्याचा विडा उचललाय.

महाराष्ट्र सरकार 'राज्यमाता' दर्जासोबत प्रत्येक देशी गायीसाठी दररोज ५० रुपयांची सबसिडी गोशालेला देणार आहे. म्हणजे,

गायीला सुद्धा लाडक्या बहिणीप्रमाणे १५०० रुपये महिना. पण गमतीचा भाग म्हणजे,

त्याच महाराष्ट्रात गरीब लहान मुलांना शाळेत जे मिड डे मिल / दुपारचे जेवण मिळते, त्यासाठी सरकारचे अनुदान आहे,

पहिली ते पाचवी ५ रुपये ४५ पैसे

आणि सहावी ते आठवी ८ रुपये १७ पैसे.

विद्यार्थ्यांपेक्षा, शिक्षणापेक्षा, लहान मुलांच्या आरोग्यापेक्षा गायीवर जास्त फोकस असल्यावर गोबरपट्टाच बनणार ना.

नाहीतरी शिकून काय करणार आहेत ?

त्यापेक्षा गोरक्षकच बनतील.

अर्थात या गोशाळा कोणाच्या ताब्यात असणार आणि या सबसिडीचा फायदा कोणाला पोचवला जाणार हे समजण्यासाठी फार विद्वत्ता असण्याची गरज नाही. एकदा लक्ष देऊन बघा, गोशाळा चालवणारे नेमके कोण आहेत ते...थोडक्यात आडमार्गाने सरकारी म्हणजे आपला पैसा निवडकांना आणि खास संस्थांना वाटता यावा यासाठी केलेली कायदेशीर तरतूद आहे ही.

**साभार**

लोकसंसद

## ''कालाय तस्मे नमः''

जगात काही गोष्टी ऐकावे ते नवलच...! जपानमध्ये सध्या तांदुळाची प्रचंड टंचाई आहे . तेथे ''किनमेमाई'' या जातीच्या तांदुळाचा भाव किलोला दहा हजार रुपये एवढा प्रचंड आहे. १७ वर्षांपूर्वी ही जात विकसित करण्यात आली होती. या तांदुळाची वैशिष्ट्ये म्हणजे या तांदुळात अधिक प्रतिकार शक्ती आहे. यामध्ये पौष्टिक मूल्य सुद्धा अधिक आहे. हा तांदूळ चांगले आरोग्य राखणारा आहे. जपानमध्ये हा तांदूळ १४० ग्रॅमच्या पाकिटात उपलब्ध होतो. गेल्या आठ वर्षांपूर्वी या तांदुळाचा भाव किलोला सुमारे नऊ हजार शंभर रुपयांवर गेला होता. भारताचा विचार केल्यास अत्यंत चांगल्या दर्जाच्या तांदुळाला भारतात किलोला सर्वसाधारणपणे ३०० रुपये मोजावे लागतात. मध्यंतरी मध्य प्रदेशात सुद्धा आंब्याची एक जात अत्यंत महागडी विकसित करण्यात आली होती. विशेष म्हणजे लोक सुद्धा असे महागडे तांदूळ किंवा आंबे आवडीने खरेदी करत आहेत. हल्लीच्या काळी लोकांना पैशाचे महत्व फारसे वाटेनासे झाले आहे. ही परिस्थिती सुमारे तीस चाळीस वर्षांपूर्वी नव्हती. अर्थात ही चांगली घटना आहे यात शंका नाही. त्या काळात चांगली फळे घेण्याची लोकांची ऐपत नव्हती. आज ती परिस्थिती राहिलेली नाही एकूणच आज अन्नधान्य भरपूर पिकत आहे. तसेच लोकांची क्रयशक्ती सुद्धा वाढलेली आहे. शेतीमध्ये विविध प्रयोग करून विविध जातीची व रंगाची फळे निर्माण होत आहेत. भाजीपाल्याच्या अनेक जाती सुद्धा बाजारात येत आहेत. ही सारी काळाची किमया आहे म्हणून म्हणावेसे वाटते ''कालाय तस्मे नमः''

**- शांताराम वाघ,** पुणे

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**८ ऑक्टोबर**

**१८८८:-** कवी, प्राचीन भारतीय वाङ्‌मयाचे अभ्यासक व षड्दर्शनज्ञ महादेव मोरेश्वर कुंटे यांचे निधन. 'षड्दर्षन चिंतनिका' आणि 'व्हिसिटयूडस ऑफ आर्यन सिव्हिलायझेशन इन इंडिया' या ग्रंथामुळे जगात (विशेषतः युरोपात) त्यांचा नावलौकिक झाला. याशिवाय 'राजा शिवाजी' मराठी साहित्यात आणण्याचा प्रयोग त्यांनी केला. 'ऋषी' या ७७० ओळींच्या काव्यातून चार हजार वर्षापूर्वीचे आर्यजीवन त्यांनी चितारले होते. **१८९१:-** उद्योगासोबत साहित्याचाही वारसा तेवढ्याच ताकदीने सांभाळणारे शंकरराव वासुदेव किर्लोस्कर यांचा जन्म. 'किर्लोस्कर खबर' चे त्यांनी 'किर्लोस्कर' मासिकात रुपांतर केले. त्यासाठी खास छापखाना उभारला. 'स्त्री, मनोहर' नियतकालिकांची सुरुवात केली. विक्रीशास्त्राच्या पदवीपूर्वी चित्रकलेचाही शास्त्रशुद्ध अभ्यास केलेल्या शंकररावांच्या चित्र-गद्याचे पुस्तक 'शंवाकिंची चित्रकला' या नावाने प्रसिध्द झाले, तर 'शंवाकिनी' हे आत्मचरित्र आणि 'यात्रिकाची यात्रा' हे पुस्तक त्यांनी लिहिले. **१९०७:-** लेखक, स्वातंत्र्यसेनानी, 'भूदानयज्ञ' या साप्ताहिकाचे संपादक, श्रीरामकोषाचे सहसंपादक सदाशिव जगन्नाथ धर्माधिकारी उर्फ भाऊ यांचा जन्म. 'बदला बळी' ही एका धीरोदत्त बलिदानाची कथा, 'मधुबोध' हा मनुस्मृतीवर आधारित निबंध, 'येशुख्रिस्त', 'म. गांधी यांच्या चरित्रासह 'हरीचे प्यारे हरिजन' हा अस्पृष्य जमातीतील भक्तांच्या गोष्टी, याशिवाय १० हून अधिक संकलित संपादित साहित्य तसेच भाषाषास्त्र असे दहाच्या आसपास ग्रंथ, त्यामध्ये 'गुजराथी भाषा प्रवेश', 'मराठी गुजराथी शब्दकोश', तसेच 'आचार्य पलानी' यांच्या चरित्रासह देशोदेशीच्या लोककथा, 'लोकशाहीचे स्वरुप' मिळून १५ हून अधिक ग्रंथ संपदा आणि 'चाणक्य चंद्रगुप्त' आणि 'गुप्तकालिन इतिहास' यावर ९ कादंबऱ्या मिळून ५० हून अधिक ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. **१९०८:-** लेखक, पेशाने वकील आणि जे. कृष्णमूर्तींच्या तत्त्वज्ञानाचे अभ्यासक चंडीदास गुंडी जोशी यांचा जन्म. ह्यांनी जे. कृष्णमूर्तींच्या तत्त्वज्ञानावर 'कृष्णमूर्ती म्हणतात तरी काय?', 'चालू क्षण हेच जीवन', 'जीवनाचा नवा विचार', 'जीवनातील अनेक नाती' आदी ग्रंथ लिहिले असून 'अवघे जीवन सुंदर होईल का?' या ग्रंथासह 'प्रेमाची कला' हे एरिक फ्रॉम यांच्या 'आर्ट ऑफ लिव्हिंग' या ग्रंथाचा अनुवाद केला आहे. **१९१२ :-** लेखक, पत्रकार शंकर लक्ष्मण चिटणीस यांचा जन्म. ह्यांची 'भारतीय कामगार चळवळ', 'हिंदु मुसलमानांचा झगडा कसा मिटेल?' ह्या वैचारिक पुस्तकांसह 'रामायण', 'महाभारत' तसेच 'सरोजिनी नायडू', 'डॉन ब्रॅडसन', 'एडीसन', 'चित्तरंजन दास' आदींवरील पुस्तके लिहिलीत. याशिवाय 'धावते जग भाग १, २', 'महान परिवर्तन', 'कामगार संघटनेचे तत्त्वज्ञान' मिळून १३ अनुवादीत पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९१२:-** विनोदवीर, नाटककार हरी विनायक बडेकर यांचा जन्म. त्यांनी 'नर की नारायण', 'स्त्री', 'ढकलगाडा' ही नाटके तसेच 'चलेजाव', 'जनता एक्सप्रेस' हे विनोदी लेखसंग्रह आणि प्रौढ साक्षरांसाठी काही पुस्तके लिहिली. **१९२०:-** अनुवादक, कथाकार उमाकांत भीमराज ठोमरे यांचे निधन. 'वीणा' या मासिकाचे आणि 'साहित्य कवडसे' या दिवाळी अंकाचे संपादन. 'इन्किलाब जिंदाबाद आणि इतर कथा', 'सुखदुःख', 'कानफाट्या', 'नेत्रपल्लवी' हा लघुकथांचा संग्रह तसेच 'चक्रावर्त' हा बंगाली कादंबरीचा आणि चिक्कवीर राजेंद्र या कन्नड कादंबरीचा अनुवाद केला. **१९३१:-** कथा कांदबरीकार उद्धव जयकृष्ण शेळके यांचा जन्म. 'शिळन' हा त्यांचा कथासंग्रह वैदर्भीय ग्रामीण जीवनाच्या सुक्ष्म चित्रणामुळे वैशिष्ट्यपूर्ण ठरला. 'धुंदी', 'पुरुष', 'नांदत घरं', 'कोवळीक', 'महामार्ग गोल्डन व्हिला', 'बाईविणा बुवा', 'निर्माता' या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. तथापि 'धग' ही त्यांची एक अलौकिक कलाकृती. **१९४२:-** आकाशवाणी, दूरदर्षनसाठी लेखन करणाऱ्या विनिता जयंत ऐनापुरे यांचा जन्म. 'अपेक्षा' ही कथा आणि 'मला संस्कृत येते' हे पुस्तक त्यांनी लिहिले आहे. **१९५०:-** लेखक डॉ.विकास गोगटे यांचा जन्म. वृत्तपत्रातून आरोग्यविषयक लेखन करण्याच्या निमित्ताने दै.गावकरी मधून पत्नी सौ.विनीता गोगटे यांच्यासह 'डॉक्टरांकडे जाण्यापूर्वी' ह्या शिर्षकाखाली लिहिलेली त्यांचे एक लोकप्रिय सदर. हेच सदर नंतर पुस्तकरुपी प्रसिद्ध झाले.

**- संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

# आदिवासी समाज रस्त्यावर उतरला

## धनगर समाजाला अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करण्याला विरोध

**। नेरळ । वार्ताहर ।**

**अनुसूचित जमातीमध्ये धनगर समाजाचा समावेश करु नये या मागणीसाठी कर्जत आणि खालापूर तालुक्यातील आदिवासी समाज रस्त्यावर उतरला होता. शेकडोच्या संख्येने आदिवासी नागरिक मोर्चात सामिल झाल्याने रस्त्यावर मानवी साखळी निर्माण झाल्याचे दिसून आले.**



आदिवासी समाजाच्या आरक्षणात धनगर समाजाचा समावेश करू नये यासाठी कर्जत आणि खालापूर तालुका आदिवासी समाजाच्यावतीने तयार करण्यात आलेल्या समन्वय समितीच्यावतीने कर्जत प्रांत अधिकारी कार्यालयावर मोर्चा आयोजित करण्यात आला होता. कर्जत शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथून निघालेला मोर्चा स्टेशन रस्त्याने जकात नाका येथून मुख्य बाजारपेठमार्गे लोकमान्य टिळक चौक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकामार्गे पोलीस मैदानात पोहचला. तेथे मोर्चाचे सभेत रुपांतर झाले. मैदानात झाडे नसल्याने रणरणत्या उन्हात शेकडो आदिवासी लोक उभे होते. त्यावेळी व्यासपीठावर पुणे जिल्हा आदिवासी संघटना अध्यक्ष जनार्दन लांगे यांच्यासह समन्वय समितीचे परशुराम दरवडा, नारायण डामसे, जयवंती हिंदोळा, विष्णू खैर, साचून वाघमारे, दिलीप डाके, मारुती पवार, दत्तात्रय सुपे, हिराबाई पवार, जयवंत शीद, अक्षय तिटकारे, देवराम पवार आदी उपस्थित होते. धनगर समाजाला आदिवासीमध्ये आरक्षण देण्याचे प्रयत्न चालू आहेत.

धनगर व धनगड हे एकच आहेत असे परिपत्रक काढण्याच्या हालचाली चालू आहेत. याला आमचा तीव्र विरोध आहे, असे जनार्दन लांगे यांनी सांगितले. रायगड जिल्ह्यामध्ये वन जमीनी, दळी जमीनी अद्याप ही नावे झाल्या नाहीत व इतर ही समस्या आहेत. त्या सोडविण्याचे आश्वासन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहे, असे लांगे यांनी सांगितले.

जाहीर सभेनंतर कर्जत येथील प्रशासकीय भवनमध्ये निवेदन देण्यात आले. कर्जतचे प्रांत अधिकारी निवडणूक कामासाठी कर्जत बाहेर असल्याने कर्जतचे तहसीलदार डॉ धनंजय जाधव यांच्याकडे ते सादर केले. कर्जत तहसीलदार यांना देण्यात आलेल्या निवेदनात धनगर सम ाजाला आदिवासीमध्ये आरक्षण देवू नये, वन जमिनी, दळी जमीनी आदिवासींच्या नावे करा, कर्जत-खालापूर तालुक्यात पेसा कायदा लागू करा, रेशन दुकानावर हक्काचे रेशन मिळालेच पाहिजे, आरोग्य केंद्राची दुरावस्था सुधारावी, बोगस आदिवासी नोकर वर्गास बडतर्फ करून फौजदारी गुन्हे दाखल करा, शाळा कंत्राटीकरण निर्णय रद्द करा अशा विविध मागण्यांचा निवेदनात समावेश करण्यात आला होता.

गेल्या काही वर्षांपासून आदिवासी समाजाच्या हक्कासाठी विविध सामाजिक संघटना लढा देत आहेत. सातत्याने मागणी करुनही सरकार आणि प्रशासन याकडे दुर्लक्ष करत आहेत. त्यातच आता आदिवासींच्या ताटातील आरक्षणाचा घास धनगर समाजाच्या ताटात देण्यात येत आहे. या विरोधात आदिवासी समाजामध्ये प्रचंड संतापाची लाट निर्माण झालेली आहे.

---

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

८ ऑक्टोबर

१) श्रीम.सुधा गजेंद्र दळी
८-१०-१९४४

२) श्री.गोपाळ वामन लिमये
अलिबाग, ८-१०-१९३१

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**दुर्वेश नितीन म्हात्रे स्मरणार्थ अलिबाग**



**सौ. मुग्धा विलास पाटील, वाढदिवस, अलिबाग**

---

## उरणमध्ये वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

**। उरण । वार्ताहर ।**

पर्यावरण विषयक जनजागृती करण्याच्या दृष्टीकोणातून व पर्यावरणाचे संरक्षण, संवर्धन करण्याच्या अनुषंगाने रविवारी ६ ऑक्टोबर २४ रोजी डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांच्यावतीने उरण तालुक्यातील करंजा गावातील नव्याने सुरु झालेल्या मच्छिमार गोदी येथे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी मच्छिमार सोसायटीचे अध्यक्ष प्रदीप नाखवा, नवापाडा गाव अध्यक्ष मनोहर कोळी, दिलीप कोळी, नारायण नाखवा तसेच इतर सदस्य उपस्थित होते. यावेळी झाडे लावा झाडे जगवा, असा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देण्यात आला.

---

## कामिनी खानेंना व्दितीय क्रमांक



**। रसायनी । वार्ताहर ।**

पुणे मराठी ग्रंथालय आयोजित पुस्तक परिक्षण स्पर्धेत उत्कृष्ट परिक्षणाबद्दल रसायनी येथील खाने आंबिवली गावातील कामिनी सुरेश खाने यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला. कामिनी खाने यांनी कादंबरी पुस्तकाच्या केलेल्या परिक्षणामुळे संबंधित पुस्तकाचे अंतरंग वाचकांना सहजपणे उलगडता आले.

पुस्तक परिक्षणाच्यानिमित्ताने कामिनी खाने यांनी केलेल्या अभ्यासाचे प्रतिबिंब त्यांच्या परिक्षणात उतरले आहे. त्याबद्दल त्यांचे पुणे मराठी ग्रंथालयाचे अध्यक्ष धनंजय बर्वे, कार्याध्यक्ष श्रीकांत देव यांनी अभिनंदन केले आहे.

---

## मुंबई कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंटमध्ये मोदक स्पर्धा

**। अलिबाग । वार्ताहर ।**

गेल्या पंधरा वर्षांची परंपरा पाळत मुंबई कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अलिबाग येथे मोदक स्पर्धा आयोजित केली होती. सोहळ्याला प्रमुख परीक्षक म्हणून नलिनी काकू मुंबईकर, यू ट्यूब सेलिब्रिटी, रॅडीसन ब्लूचे बेकरी विभागाचे शेफ सुरेश म्हात्रे, आणि रॅडीसन ब्ल्यूचे एचआर मॅनेजर ज्ञानेश्वर राऊत होते. परीक्षकांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

दोन गटांमध्ये स्पर्धा घेतली गेली. एक विद्यार्थी गट आणि दुसरा खुला गट. खुल्या गटात अनेक सुगरणींनी भाग घेतला आणि विद्यार्थी तर अत्यंत उत्साहात सहभागी झाले. सगळे स्पर्धक अतिशय उत्तम शेफ आहेत हे आज जाणवलं. उत्तमोत्तम सादरीकरण, नवनवीन संकल्पना आणि भन्नाट चवीचे हे मोदक डोळ्यांचे तसेच चवीचे पारणे



फेडणारे होते, असे मत परिक्षकांनी व्यक्त केले. सगळ्या स्पर्धकांना एक उत्तम अनुभव भेटला असेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

सगळ्या परीक्षकांनी स्पर्धकांना भेटून, चव घेऊन आणि त्या मागची संकल्पना समजून घेऊन आपला निकाल दिला. दोन्ही गटात प्रत्येकी तीन विजेते जाहिर करण्यात आले. खुल्या गटात प्रथम क्रमांक-सरला नाईक, द्वितीय क्रमांक-मीरा घरत व तृतीय क्रमांक-प्रिती म्हात्रे आणि विद्यार्थी गटात प्रथम क्रमांक-सलोनी मयेकर, द्वितीय क्रमांक-मानस म्हात्रे, तृतीय क्रमांक अक्षय महाडिक हे विजेता ठरले. विजेत्यांना पारितोषिक, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच रिया पडवळ, वृषभ भोईर, ऋतिक गायकवाड यांना उत्तेजनार्थ सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच सगळ्या स्पर्धकांना सहभागी झाल्याबद्दल सन्मानपत्र देण्यात आले.

परीक्षकांना सन्मानचिन्ह आणि एक फुलझाड (रोपटे) देण्यात आले. संपूर्ण सोहळा अत्यंत यशस्वी झाला. नलिनी काकू, शेफ सुरेश म्हात्रे यांनी छान मार्गदर्शन केले आणि स्पर्धकांचा उत्साह वाढवला.

सोहळ्याची संकल्पना त्याचे सादरीकरण आणि ते पूर्ण करण्याचे महत्त्वाचे काम प्रा. रश्मी वाघे यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन देण्याचे काम प्रा. श्रेयस म्हात्रे, आणि प्रा. गंधर्व पाटील यांनी केले.

प्रा. आशुतोष गुरव, प्रा. स्वरांगी कवळे, आश्लेषा लोहार, महेश वेळे आणि निलदीप पाडावे यांनीही आयोजन यशस्वी करण्यात अथक प्रयत्न केले.

प्रा. अनुराधा तेरेदेसाई यांनी आभार प्रदर्शन केले. त्यांनी संस्थेची उद्दिष्टे सांगितली. सगळ्या स्पर्धकांना हॉटेल व्यवसायात असलेल्या अनेक संधींची ओळख करून दिली. स्पर्धकांनीपण त्यांचा आनंद व्यक्त केला आणि ही स्पर्धा आवडल्याचे सांगितले.

---

## समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी अनोखे आंदोलन

### अधिकाऱ्यांच्या हातात देणार खेळण्यातील माकड

**। तळा । वार्ताहर ।**

शहरासह तालुक्यामध्ये माकडांचा व जंगली प्राण्यांनी मोठ्या प्रमाणात उच्छाद मांडला असून स्थानिकांना मोठ्या त्रासाला सामोरे लागत आहे. या गंभीर समस्येकडे वनविभागाचे लक्ष वेधण्यात आले. मात्र, प्रशासनाने दखल घेतली नाही. दिवसेंदिवस माकडांची पैदास मोठ्या प्रम ाणात वाढली असल्यामुळे त्यांचे राहणीमान जंगल सोडून मानवी वस्तीत आल्यामुळे मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. लहान मुलांना एकट्याला सोडायची सोय राहिली नाही. या म ाकडांचा हैदोस इतका वाढला की, शेतकरी देखील कुठल्या प्रकारची शेती करायला तयार होत नाही. काही ठिकाणी शेती पिकली तर पिक येईल याची खात्री नाही. तळा तालूका डोंगराळ भागात आहे. शेती हे एकमेव उदरनिर्वाहाचे साधन आहे. रान डुक्कारांमुळे नासधुस होत आहे. माकडे भाजीपाला, फळफळावळ, कडधान्ये, कपडे, वाळवणे अन्नधान्ये चोरून किंवा पळवून नेत आहेत. घराची कौले काढून बंद घरात शिरून नासधुस करीत आहेत. उच्छाद मांडणाऱ्या माकडांचा कायमचा बंदोबस्त करण्याची मागणीसाठी होत आहे.

---

## रक्तदान आरोग्य शिबिर संपन्न

**। पनवेल । वार्ताहर ।**

खारघर सेक्टर ३६ मधील सिडकोने बांधलेल्या स्वप्नपूर्ती हाऊसिंग सोसायटीमध्ये नवरात्र उत्सवाचे आयोजन केले जाते. यंदाचे हे सहावे वर्ष असून यावर्षी त्यांनी सामाजिक उपक्रम राबवत असताना टाटा कॅन्सर हॉस्पिटलच्यावतीने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. यामध्ये संकुलातील ७८ लोकांनी रक्तदान केले आणि आपली सामाजिक भावना दाखवून दिली. याचवेळी आरोग्य शिबिराचे सुद्धा आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रक्तदाब, निरोपती इसीजी, नेत्र तपासणी करण्यात आली.



स्वप्नपूर्ती सांस्कृतिक उत्सव मंडळ हे नोंदणीकृत मंडळ असून संकुलामध्ये नवरात्र उत्सव साजरा करत असताना दरवर्षी विविध सांस्कृतिक, सामाजिक उपक्रम राबवत आहे. या वर्षी सुद्धा त्यांनी लहान मुलांसाठी जादूचे प्रयोग, समस्त नागरिकांसाठी श्री गणेश प्रासादिक भजन मंडळाचा कार्यक्रम ठेवला होता. स्वप्नपूर्ती सांस्कृतिक उत्सव मंडळाचे संस्थापक अध्यक्ष शरद बिबवे, अध्यक्ष सचिन बारवे सचिव संदीप खोचरे, यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांनी विशेष मेहनत घेत कार्यक्रम यशस्वी केला.

---

## सामाजिक उपक्रमाने वाढदिवस साजरा

**तळा :** विविध सामाजिक उपक्रम राबवून युवा उद्योजक अक्षय तळेगावकर याने आपला वाढदिवस साजरा केला. सोमवारी आपल्या वाढदिवसानिमित्त युवा उद्योजक अक्षय तळेगावकर याने तालुक्यातील उसर येथील श्री साई आशिर्वाद अनाथाश्रम व वृद्धाश्रमात फळ वाटप केले तसेच तळेगाव व चरई आदिवासीवाडी येथील मराठी शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व पंखे भेट स्वरूपात दिले. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो. ही भावना मनात जपून दरवर्षी अक्षय वाढदिवस सामाजिक उपक्रम राबवून साजरा करतो.

---

## गोखले महाविद्यालयात सायबर सुरक्षा

**। बोर्लीपंचतन । वार्ताहर ।**

श्रीवर्धन येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालयात शुक्रवार दिनांक ०४ ऑक्टोबर २०२४ रोजी महाविद्यालयाचा एनएसएस विभाग आणि श्रीवर्धन पोलीस ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने, सायबर सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रम पार पडला. महाविदयालयाचे प्राचार्य, डॉ. श्रीनिवास जोशी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक, उत्तम रीकामे तसेच अंशु या संस्थेचे निलेश गुंडो या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी व मार्गदर्शक होते. उत्तम



रिकामे यांनी व्यासपीठावरून मार्गदर्शन करताना, सध्या देशात आणि राज्यात जे ऑनलाईन फ्रॉड सर्रासपणे होत आहेत. त्याची घडणारी अनेक उदाहरणे देऊन कशी काळजी घ्यावी या विषयी सजग केले. तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास जोशी यांनी अध्यक्षपदा वरून बोलताना, प्रत्येक व्यक्तीकडे आता मोबाईल असल्याने बँकींग व्यवहार जपूनच करायला हवेत व तरुणांनी आपल्या पालकांनाही सजग करावे, असे आवाहन केले.

या प्रसंगी पीपीटी प्रेझेंटेशनच्या माध्यमातून अंशु या संस्थेचे निलेश गुंडो यांनी कोणकोणत्या अँपच्या म ाध्यमातून विविध फ्रॉड होत असतात व कोणती खबरदारी घेण्यात यावी' या विषयी मार्गदर्शन केले.

---

## गणेशोत्सव संपला, आनंदाचा शिधा आला

**आगरदांडा :** शिधापत्रिकाधारकांना गणेश चतुर्थी निमित्त गोडधोड करण्यासाठी आनंदाचा शिधा वाटप देण्याचे जाहीर केले होते. मात्र गणेश चतुर्थी उत्सवा दिवशी आनंदाचा शिधा रेशनिंग दुकानात न आल्याने सण गोडधोड करण्याविणा गेला. हाच आनंदाचा शिधा नवरात्रौत्सव दिवसात गोडधोड करण्यासाठी आल्याने शिधापत्रिकाधारकांनी समाधान व्यक्त केले.

तालुक्यातील १७ हजार २७५ पेक्षा जास्त शिधापत्रिकाधारक असून ३२ रेशनची दुकाने आहेत. ग्रामीण भागात २८, तर शहरात ४ रेशनची दुकाने असून या शिधापत्रिकाधारकांना



गोर गरिबांना १०० रूपायांत आनंदाचा शिधा वितरण करण्यात आला. त्यामध्ये साखर, तेल चणाडाळ, रवा याचा समावेश आहे.

---

## नवी मुंबई पोलीस दलाच्या नावाचे एक्सवर बनावट खाते

**। पनवेल । वार्ताहर ।**

नवी मुंबईत मागील दोन वर्षात ऑनलाईन चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत असून या चोरट्यांनी उच्चशिक्षित आणि धनिकांना आपले लक्ष्य केले आहे. कोट्यवधी रुपयांच्या ऑनलाईन चोरीचे सत्र सुरु असून दिवसाला एकतरी चोरीच्या घटनांची नोंद केली जात आहे. मात्र, या चोऱ्या रोखण्यासाठी नवी मुंबई पोलीस असमर्थ ठरले असुन नवी मुंबई पोलीसांच्या नावाने बनावट एक्स खाते सुरु केलेल्या व्यक्ती विरोधात सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला. त्यामुळे ऑनलाईन चोर हे पोलीसांवर शिरजोर झाल्याचे चित्र आहे.

नवी मुंबई पोलीस दलाचे परिवर्तन काळानुरुप आधुनिक पोलीस दलात करण्यासाठी पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी कंबर कसली आहे. यासाठी आयुक्त भारंबे यांनी काही महाविद्यालयांमधील सायबर सुरक्षा विषयाच्या प्राध्यापकांच्या माध्यमातून पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे शिकवणीवर्ग सुरु करण्याचा प्रयोग केला. प्रत्येक पोलीस ठाण्यात किमान दोन तरी अधिकारी आणि चार कर्मचाऱ्यांना तरी सायबर सुरक्षेचे ज्ञान असणे गरजेचे असल्याचा हा प्रयोग नवी मुंबईत पहिल्यांदा करण्यात आला. नवी मुंबई पोलीस दलाला आयुक्त भारंबे यांच्याकाळात पहिल्यांदा सायबर सेल मध्यवर्ती पोलीस ठाणे सुरु झाले. वर्षभरात या सायबर पोलीस ठाण्यात सुद्धा ऑनलाईन चोरी व अपहाराचे २२१ गुन्हे दाखल आहेत. मोठमोठ्या उद्योगपती किंवा नामांकित व्यक्तीच्या नावाने ही चोरी भामट्यांकडून केली जाते. सायबर सुरक्षा पोलीस ठाण्यात पोलीसांनी दिलेल्या फीर्यादीमध्ये मागील चार वर्षांपासून एका अनोळखी भामट्याने एक्स या अ‍ॅपवर नवी मुंबई पोलीस दलाचे आणि पोलीस आयुक्तांच्या नावाचे बनावट खाते सुरु केल्याचे पोलीसांच्या निदर्शनास आले. तसेच या भामट्याने इन्स्टाग्रावर सुद्धा नवी मुंबई पोलीस दलाच्या नावाने बनावट खाते सुरु केले आहे. मागोवा घेत असताना पोलीसांच्या सायबर विभागाला संबंधित खाती आढळल्याने पोलीसांनी स्वतःहून या प्रकरणी गुन्हा नोंदविला आहे.

---

### श्रीवर्धनमध्ये पर्यटकांची संख्या वाढली....

# सोयी-सुविधांअभावी पर्यटकांची गैरसोय

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

**पावसाळ्यातील बंदीनंतर हळूहळू किनारपट्टी भागात पर्यटक दाखल होऊ लागले आहेत. त्यांना चांगल्या सोयी-सुविधा देण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न होत आहेत. मात्र, खड्डेमय रस्ते, मोकाट गुरे, वाहनतळाचा अभाव, घनकचरा व्यवस्थापनाच्या समस्येमुळे स्थानिकांसह पर्यटक त्रस्त आहेत. उन्हाळ्यातील पर्यटन हंगामाची सांगता २५ मे रोजी झाली. गणेशोत्सवानंतर आता समुद्रकिनारे गजबजू लागले असून स्थानिक व्यावसायिकांना दिलासा मिळाला आहे. काही ठिकाणी साहसी खेळासही सुरुवात झाली आहे.**

पुणे, मुंबईचे पर्यटक मोठ्या संख्येने तालुक्यातील हरिहरेश्वर, दिवेआगर, श्रीवर्धन, वेळास, आदगाव अशा पर्यटनस्थळांकडे येतात. परंतु, स्वच्छतागृह, चेंजिंग रूम आदी सुविधांअभावी त्यांची गैरसोय होते. श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर सुशोभीकरण करण्यात आल्याने पर्यटनाच्या हंगामात श्रीवर्धन, हरिहरेश्वर व दिवेआगरमधील लॉजेस, हॉटेल, रिसॉर्ट हाऊसफुल होतात. श्रीवर्धन ते दिवेआगर हा कोंडविलमार्गे साधारण १२ किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा आता पर्यटकांनी बहरू लागला आहे.

पर्यटकांच्या वाढती संख्या लक्षात घेता आगामी काळात रोजगाराच्या संधी वाढण्याची शक्यता आहे.
त्यामुळे स्थानिक पातळीवर ग्रामपंचायतीने स्वच्छतागृह, चेंजिंग रूम बांधण्याचे गरजेचे आहे, तसेच सरकारी पातळीवर पाठपुरावा करणेही आवश्यक आहे.

श्री क्षेत्र हरिहरेश्वर दक्षिण काशी म्हणून देशभरात प्रसिद्ध असून वर्षभर भाविक येतात. अनेकजण खासगी वाहनांतून येतात. राज्य परिवहन महामंडळाच्या अपुऱ्या बस सेवेमुळे पर्यटकांची गैरसोय होते. आरामदायी बस उपलब्ध झाल्यास हरिहरेश्वर, श्रीवर्धन, दिवेआगर व दिघी (मुरूड-जंजिरा) असे फिरणे सोयीचे जाईल, असे पर्यटकांचे म्हणणे आहे.

हरिहरेश्वर येथे एसटी वाहतूक सुरू करण्याबाबत अनेकदा एसटी प्रशासनाला विनंती केली. मात्र, प्रतिसाद मिळाला नाही. श्रीवर्धन मार्केट व श्री क्षेत्र हरिहरेश्वर येथे सरकारची वाहनतळ सुविधा असणे आवश्यक आहे. हरिहरेश्वर येथील सागरी चौकीत कायमस्वरूपी एक पोलिस कर्मचारी असावा. हरिहरेश्वर मंदिराच्यावतीने भाविकांना शक्य त्या सुविधा देण्याचा प्रयत्न आहे. त्यांना कोणताही त्रास होणार नाही. याची दक्षता घेण्यात येईल, असे मंदिराचे सचिव सिद्धेश सुनील पोवार यांनी सांगितले.

दिवेआगरला आता पर्यटक येऊ लागले आहेत. समुद्रकिनारी साहसी खेळ सुरू झाले असून वेगवेगळ्या राइड्सचा आनंद घेण्यासाठी अनेकजण आवर्जून येतात. दिवाळीत मोठ्या संख्येने पर्यटक येण्याचे अपेक्षित आहे, असे जल क्रीडा व्यावसायिक भाऊ साळुंखे यांनी स्पष्ट केले.

---

## पेण- बोरगाव रस्त्याची दुरवस्था

**। पेण । वार्ताहर ।**

तालुक्यातील पर्यटनस्थळ म्हणून नावारूपाला आलेल्या बोरगाव रस्त्याची दुरवस्था झाली असून खड्डे, चिखलामुळे परिसरातील नागरिक हैराण झाले आहेत. यातून मार्ग काढताना वाहनधारकांना चांगलीच कसरत करावी लागत असल्याने लवकरात लवकर रस्ता दुरुस्त करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. बोरगाव ग्रामपंचायतीत अनेक आदिवासी वाड्या येत असून हा डोंगराळ भाग आहे. अनेक पर्यटक बोरगाव पठारावर निसर्गाचे सौंदर्य लुटण्यासाठी येत असल्याने सतत वर्दळ असते. दोन वर्षांपूर्वी रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले होते, परंतु ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमुळे पुन्हा परिस्थिती जैसे थे असून अपघाताची शक्यता आहे.

---

## बोर्लीपंचतन येथे मुलांच्या सुरक्षिततेचे फलक



**। बोर्लीपंचतन । वार्ताहर ।**

रायगड जिल्हा पोलीस दल, जिल्हा महिला व बाल विकास महिला तसेच रायगड अर्पण संस्था मुंबई यांच्या संयुक्त विद्यमानाने बोर्लीपंचतन येथे गणेश चौकात व इतर ठिकाणी पालकांनी आपल्या मुलांना कशापद्धतीने सुरक्षित ठेवावे असे सूचना फलक लावण्यात आले आहेत.

दिघी सागरी पोलीस स्टेशनचे सपोनि हनुमंत शिंदे इतर पोलीस कर्मचारी यांनी स्वतः बोर्लीपंचतन येथे सूचना फलक बसवून तिथे जमलेल्यानागरिकांनाफलकाविषयी माहिती दिली. आपल्या मुलांशी वारंवार बोलणे, त्याचं म्हणणं एकूण घेणे, त्याच्याकडे अभ्यासा व्यतीरिक्त त्याच्याशी वेळ काढणे, त्यांच्या दिनचर्चेबद्दल समजून घेणे, मुलांना प्रोत्साहन देणे रागामध्ये मुलांशी बोलू नये. मुलांना सांगा की, त्याना नाही म्हणण्याचा अधिकार आहे, तसेच असुरक्षितता किंवा भीतीदायक अनुभवाबद्दल बोलायला प्रोत्साहन करा.

## निवडक

### नेत्र चिकित्सा शिबीर

**पनवेल :** लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम तर्फे सेवा सप्ताहानिमित्त वडाळे तलाव पनवेल येथे सकाळी चालायला येणाऱ्या नागरिकांसाठी मधुमेह तपासणी करण्यात आली. पनवेल महानगरपालिकेचे मुख्य आरोग्य अधिकारी शैलेश गायकवाड, सईद मुल्ला यांचेसहित ७९ नागरिकांनी या तपासणीचा लाभ घेतला. याप्रसंगी ए.एस.एन. मूर्ती, चेतना देढीया, मानदा पंडित, प्रेमेंद्र बहिरा, धवल शहा, अलकेश शहा, संजय गोडसे, स्वाती गोडसे, ओमकार खेडकर आदी मान्यवर उपस्थित होते.

### महिलांसाठी आरोग्य शिबीर

पनवेल : अबोली महिला रिक्षा चालक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष भगत हे महिला सदस्यांसाठी नवनवीन उपक्रम राबवित असतात. नायर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या सहकार्याने रिक्षा चालक महिलांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन नवीन पनवेल येथे करण्यात आले होते. यामध्ये डोळे तपासणी बरोबरच ब्लड प्रेशर, मधुमेह तपासणी अशा चाचण्या करण्यात आल्या. या शिबिराचा लाभ ३० महिला रिक्षा चालकांनी घेतला. सदर शिबीर नवदृष्टी आय केअर सेंटर येथे घेण्यात आले.

### आरोग्य चिकित्सा शिबीर

**खोपोली :** लायन्स क्लब ऑफ खोपोलीच्या वतीने डॉ. रामहरी धोटे सभागृह खोपोली येथील भव्य आरोग्य चिकित्सा शिबिराचे आयोजन केले होते. अनिता पीटर यांच्या मार्गदर्शनाखाली तज्ज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून साधारणता २२७ जणांची मोफत आरोग्य चिकित्सा केली गेली. या शिबिरात नाक-घसा तज्ज्ञ आणि स्त्री रोग तज्ज्ञांकडून तपासणी केली गेली. इसीजी टेस्ट, ब्लड टेस्ट सोबत स्त्रियांसाठी स्तनाचा कॅन्सर, पुरुषांसाठी तंबाखूमुळे होणाऱ्या कॅन्सरची टेस्ट केली गेली.

### मेघगर्जनेसह पाऊस

**सुतारवाडी :** सुतारवाडी आणि अन्य परिसरामध्ये देवीच्या घटस्थापनेनंतर पाचव्या दिवशी सायंकाळी पावणेचारच्या सुमारास मेघगर्जना आणि विजेच्या लखलखाटासह पावसाने हजेरी लावली. गरबा नृत्यासाठी उभारलेले मंडप पावसामुळे भिजून गेले. त्यामुळे गरबा नृत्य करणाऱ्यांची निराशा झाली. भात पिकांबरोबर नाचणी, वरी, तिळाची पिकं प्रामुख्याने घेतली जातात. परतीच्या पावसाचा धोका आता सर्व पिकांना होण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे.

### पोलिसांकडून हेल्मेटचे वाटप

**पनवेल :** वेळोवेळी नियम न पाळणाऱ्या वाहनचालकांमध्ये वाहतूक शिस्त येण्यासाठी दंड वसुलीच्या कार्यवाहीवर न थांबता तळोजातील वाहतूक विभागाच्या पोलिसांनी दुचाकीस्वारांच्या सुरक्षेसाठी हेल्मेट उपलब्ध करुन दिले आहे. वॉलरेक कंपनीने शंभर हेल्मेट उपलब्ध करुन दिल्यावर विना हेल्मेट असलेल्या दुचाकीस्वारांना हे हेल्मेटचे वाटप करण्यात आले. यामुळे अपघातांचे प्रमाण कमी होईल अशी अपेक्षा वरिष्ठ पोलीस निरीक्षक कदम यांनी व्यक्त केली.

# आदिवासी समूहाचे स्थलांतर थांबणार

**। पाली । वार्ताहर।**
**सुधागड तालुक्यातील चिवे ग्रामपंचायतीमधील जांभूळपाडा आदिवासी वाडीतील सर्व कुटुंबांना गुरुवारपासून (दि. ३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत शाश्वत रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. यात वन तलावासाठी पाच लाख २८ हजार ९०८ रुपये इतका निधी मंजूर झाला असून एक हजार ९७६ इतक्या लोकांना रोजगार मिळाला आहे.**



मजरे जांभूळपाडा गावाला २०१९ मध्ये कम्पार्टमेंट नंबर ६५१ मध्ये एकूण १३९.५ एकर इतक्या वन क्षेत्रावर सामूहिक वनहक्क अधिकार मिळाले आहेत. त्यानंतर सूक्ष्म नियोजनाची अंमलबजावणीसाठी रोहयोअंतर्गत कामे प्रस्तावित करण्यात आली होती.

उपवनसंरक्षक, अलिबाग राहुल पाटील यांनी, गावाला भेट देत आढावा घेतला. प्रस्तावित कामे वनीकरणाच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण ठरणार असून स्थानिक आदिवासींचे स्थलांतर थांबणार असल्याने प्रस्तावित कामांना तत्काळ तांत्रिक मंजुरी देण्याचे निर्देश उपवनसंरक्षकांनी संबंधित वन अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिले होते.

सामूहिक वनहक्क क्षेत्रात तळे खोदण्याचे काम सुरू करण्यात आले असून या वेळी सुधागड तालुक्याचे वनअधिकारी दादासाहेब कुकडे, सरपंच रोहिदास सखेकर, वनपाल मनोज साळवी, संकेत गायकवाड, वनरक्षक विनोद चव्हाण आदी उपस्थित होते.

अनुसूचित क्षेत्र लागू नसलेल्या (नॉन पेसा एरिया) सामूहिक वनहक्क मान्यताप्राप्त वनक्षेत्रात नरेगाअंतर्गत काम सुरू होणारे मजरे जांभूळपाडा हे महाराष्ट्रातील पहिले गाव असावे, असे वातावरण फाऊंडेशनचे कार्यक्रम व अभियान प्रमुख राहुल सावंत यांनी सांगितले.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वनतलाव बांधणे, वृक्षलागवड करणे, दगडी-नाला बांधणे व नर्सरी उभारण्यासाठी एकूण २४,७९,३९२ इतक्या निधीच्या कामांना तांत्रिक तसेच प्रशासकीय मंजुरी देण्यात आली असून याअंतर्गत ८,२४२ इतक्या लोकांना दिवसाचा रोजगार निर्माण होणार आहे.

> **गतवर्षी नागरिकांना सामूहिक वनहक्क क्षेत्रामध्ये शाश्वत रोजगार निर्माण करून देण्याचे आश्वासन दिले. त्या आश्वासनावर येथील नागरिकांनी वर्षभर विश्वास ठेवला. आज अखेर या नागरिकांना वन व्यवस्थापनाच्या माध्यमातून रोजगार मिळाला आहे.**
> **– राहुल पाटील, उपवनसंरक्षक रायगड अलिबाग**

रोजगार हमी योजनेअंतर्गत कामे कशाला करता ते तुम्हाला परवडणार नाही, ही कामे कधी मंजूर होणार नाहीत, असे सांगून आम्हाला गावातून उद्योग-व्यवसायासाठी घेऊन जाण्याचा प्रयत्न अनेक ठेकेदारांनी केला; मात्र आम्हाला राहुल पाटील यांच्यावर विश्वास होता आणि आज तो सिद्धही झाल्याचे विचार सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समितीच्या सदस्या भारती पवार यांनी व्यक्त केले.

> **सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समिती, मजरे जांभूळपाडा समितीच्या माध्यमातून वनरक्षणाच्या अनुषंगाने निश्चित आदर्श पायंडा पडणार आहे. त्यामुळे या मोहिमेत ग्राम पंचायत पातळीवर जी मदत या समितीला लागणार आहे, ती सर्वतोपरी करायला ग्रामपंचायत सज्ज आहे. वनरक्षणाच्या मोहिमेत इतर ग्रामपंचायतींनीही सक्रिय सहभाग घ्यायला हवा.**
> **– रोहिदास साजेकर, सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत, चिवे.**

# गणित पाठ्यपुस्तकात ‘पाय’चा वापर महत्त्वाचा

**गणित अभ्यासक राजेश सुर्वे यांचे मत**

**कोर्लई । वार्ताहर ।**
शालेय शिक्षणात इयत्ता सातवी ते दहावी गणित पाठ्यपुस्तकातील वर्तुळाचे क्षेत्रफळ इतर आकृतींचे घनफळ व पृष्ठफळ काढण्यासाठी वापरण्यात येणारा ‘पाय’ ३.१४ व २२/७ चुकीचा आहे. अचूक उत्तरासाठी ३.१४२८ या ‘पाय’ चा विचार करणे ही काळाची गरज असल्याने याच ‘पाय’ चा वापर होणे महत्त्वाचे असल्याचे गणित अभ्यासक राजेश सुर्वे यांनी म्हटले आहे. यासंदर्भात महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्याशी पत्रव्यवहार केला आहे.

शाळेतील इयत्ता आठवी, नववी व दहावीच्या गणित भाग ‘पाय’ या पाठ्यपुस्तकातील वर्तुळाचे पाय २२७ व ३.१४ चुकीचे असल्याबाबत राजेश सुर्वे यांनी राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सेक्रेटरी, संचालक यांच्या कडे १८ मार्च २०२४ रोजी पत्रव्यवहार केला असता राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सचिवांनी आपल्या कार्यालयाच्या कार्यकक्षेत बाब येत नसल्याने पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी राजेश सुर्वे याचे पत्र राज शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे यांच्याकडे वर्ग केले होते.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ संचालक यांनी सदर पत्राची दखल घेऊन इयत्ता दहावी गणित भाग पाय या पाठ्यपुस्तकातील त्रुटीबाबत कळवलेले आहे. सदर कळवलेली त्रुटी गणित विषय समिती सदस्यांपुढे विचारार्थ ठेवण्यात आली होती. याबाबत समिती सदस्यांच्या अभिप्रायानुसार इयत्ता सातवी पृष्ठ ७५ व पृष्ठ ७६), इयत्ता आठवी (पृष्ठ ५), इयत्ता नववी (भाग १, पृष्ठ २३ व पृष्ठ २४) या इयत्तांच्या गणित पाठ्यपुस्तकात या संकल्पनेबद्दल आवश्यक तेवढे विवेचन दिले आहे.

‘पाय’ ही अपरिमेय संख्या असली तरी व्यवहारात या संख्येचे आकलन होण्यासाठी तिची अंदाजे किंमत २२७ परिमेय संख्येच्या रूपात किंवा ३.१४ वापरली जाते. हे पाठ्यपुस्तकात नमूद केले आहे. त्यामुळे ‘पाय’ ची दोन्हीपैकी कोणतीही किंमत घेऊन काढलेले उत्तर बरोबरच आहे याची कल्पना विद्यार्थ्यांना आहे. तसेच इयत्ता आठवीच्या (पृष्ठ १०३) गणित पाठ्यपुस्तकात क्षेत्रफळाचे सूत्र तयार करण्याची पद्धतीसुद्धा दिली आहे.

‘पाय’ ची एकच किंमत सर्वमान्य असल्याशिवाय पाठ्यपुस्तकात ती देणे शक्य नाही त्यामुळे आपण केलेल्या विनंतीनुसार पाठ्यपुस्तकात बदल करणे संयुक्तिक नाही. असे मंत्री, शालेय शिक्षण व मराठी भाषा यांच्या कार्यालयातील विशेष कार्यकारी अधिकारी यांना कळविण्यात आले आहे.

## फायनेस्ट टेक्नो फॅब कंपनीच्या लोगोचे अनावरण



**। पेण । प्रतिनिधी ।**
फायनेस्टटेक्नो फॅब या कंपनीच्या नवीन लोगोचे अनावरण घटस्थापनेच्या मुहूर्तावर राजेंद्रनाथ जोशी यांची कन्या स्वरा जोशी हिच्या हस्ते नुकतेच फायनेस्टटेक्नो फॅब कंपनीच्या कार्यालयात झाले.

धामणी येथे २०२१ पासून राजेंद्रनाथ जोशी यांनी स्वत:ची फायनेस्टटेक्नो फॅब कंपनीची मुहूर्तमेढ रोवली. तेव्हापासून आपल्या कंपनीतून त्यांनी अनेकांची स्वप्ने पूर्ण करुन आपली कंपनी कार्यरत ठेवली. फायनेस्टटेक्नो फॅब कंपनीच्या लोगोचे अनावरण स्त्री शक्तीचा आदर करत आपल्या लेकीच्या हस्ते केले. यावेळी राजेंद्रनाथ जोशी, सपना जोशी उपस्थित होते.

फायनेस्टटेक्नो फॅबचा लोगो कमर्शिअल आर्टिस्ट योगेश निखारे यांनी बनविला असून, सदरच्या लोगोमध्ये फायनेस्टटेक्नो फॅब कंपनीच्या कलात्मक क्रांती घडविण्यासाठी मशाल स्वरुपातून लोगोची मांडणी केली आहे.

## मधुकर भोनकर यांचे निधन

**माणगाव :** माणगावचे व्यापारी सुभाष भोनकर यांचे धाकटे बंधू व माजी रायगड जिल्हा परिषद सदस्य मीनल भोनकर यांचे पती माणगावचे माजी ग्रामपंचायत सदस्य मधुकर चंद्रकांत भोनकर यांचे सोमवारी (दि.७) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, एक मुलगा, एक मुलगी,जावई असा परिवार आहे. त्यांच्या निधनाची माहिती माणगावसह रायगड जिल्ह्यात सर्वांना समजताच अनेकांनी त्यांच्या माणगाव निजामपूर रोड मार्गावरील निवासस्थानी येऊन त्यांचे अंत्य दर्शन घेऊन भोनकर कुटुंबियांचे सांत्वन केले. माणगाव येथील स्मशान भूमीत यांच्यावर अंत्य संस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जन समुदाय उपस्थित होता.



## पांडुरंग गोविलकर यांना देवाज्ञा

**खांब :** रोहा तालुक्यातील कृषीनिष्ठ बाहे गावातील कृषीनिष्ठ शेतकरी तथा वारकरी व सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग जानू गोविलकर यांना शनिवारी (दि.५) राहत्या घरी वयाच्या सुमारे ६५ व्या वर्षी देवाज्ञा झाली. त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी समाजातील विविध स्तरांतील नागरिक व त्यांचे आप्तस्वकीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुलगे, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार असून त्यांचे दशक्रियाविधी सोमवारी (दि.१४) तर अंतिम धार्मिकविधी गुरूवारी (दि.१७) राहत्या निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.



## काशिनाथ जाधव यांचे निधन

**खांब :** बाहे गावातील काशिनाथ मानाजी जाधव यांचे रविवारी (दि.६) वयाच्या ९५ व्या वर्षी राहत्या निवासस्थानी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांनी आपल्या आयुष्यात शेती क्षेत्राला विशेष प्राधान्य देऊन शेतीमध्ये विविध प्रकारचे प्रयोग करून एक वेगळा आदर्श निर्माण केला. तरूणांनी शेतीकडे का लक्ष द्यावे याबाबत ते नेहमी मार्गदर्शन करत. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी यांच्यासह त्यांचे आप्तस्वकीय व मित्रपरिवार यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांचे अंत्यदर्शन घेऊन त्यांच्या परिवाराचे सांत्वन केले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, पाच मुली, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार असून त्यांचे दशक्रियाविधी मंगळवारी (दि.१५) तर अंतिम धार्मिकविधी शुक्रवारी (दि.१८) निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.



## शिवकालीन महाराष्ट्र इतिहासातील सोनेरी पान

**श्रीराम महाजन यांचे प्रतिपादन**

**। दिवेआगर । वार्ताहर ।**
सार्वजनिक वाचनालय दिवेआगर वर्धापन दिनानिमित्त दापोली येथील प्रसिद्ध व्याख्याते श्रीराम महाजन यांचे शिवचरित्रातील ‘स्व’ ची प्रेरणा विषयाचे व्याख्यान ठेवले होते. यावेळी महाजन यांनी शिवकालीन महाराष्ट्र हे भारताच्या इतिहासातील सोनेरी पान आहे त्याचे जतन करणे सर्वांचे आद्य कर्तव्य आहे, असे प्रतिपादन केले.

साडेतीनशे वर्षांपूर्वी मोगलांना नेस्तनाबूत करुन शिवरायांनी पारतंत्र उखडून टाकले व हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावू नये अशी आज्ञा करणारे छत्रपती शिवाजी महाराज हे खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते.छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे केवळ युद्ध नव्हे तर शिवाजी महाराज म्हणजे सुप्रशाशन जनते मध्य स्व जागवणारा राजा,जनतेची काळजी घेणारा, जनतेला एकत्र करून आत्मविश्वास देऊन लढायला शिकवणारा राजा, शब्दकोश तयार करणारा राजा, बळाला बळाने उत्तर देणारा राजा होता अशा अनेक पुराव्यांचा दाखला देत आणि संस्कृत, फारसी अभ्यास सांगितला तेव्हा दिवेआगर शहरातील उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.

## सुदर्शनची स्वच्छता जनजागृती रॅली

**। खाब । वार्ताहर ।**
रोहा तालुक्यातील तळवलीतर्फे अष्टमी ग्रा.पं.हद्दीमध्ये सुदर्शन कंपनीच्या माध्यमातून स्वच्छता रॅली काढून जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला. या कंपनीच्या सी.एस.आर विभाग प्रमुख माधुरी सणस यांच्या विशेष मार्गदर्शनानुसार कचरा व्यवस्थापन प्रकल्प अंतर्गत ‘स्वच्छता ही सेवा’ अभियान मोठ्या उत्साहात पार पडले.




यावेळी तळवली व चिल्हेचे जि.प.शाळेचे मुख्याध्यापक, सरपंच रवींद्र मरवडे, उपसरपंच संदीप महाडिक तसेच सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज सी.एस.आर विभागाच्या स्वाती मोहिते, वैशाली मुळे, अमर चांदणे, इनोरा संस्थेचे विजय भालेराव, कुमार आणि विनय देशमुख यांच्यासह ग्रामस्थ व महिला उपस्थित होत्या.

यावेळी गावातील प्रमुख भागात श्रमदानाचे आयोजन करण्यात आले होते. जिथे स्थानिक नागरिकांनी व जि.प.शाळेच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी नागरिकांना प्रतिज्ञा देऊन स्वच्छता टिकवण्याचे वचन देण्यात आले आणि कचरा व्यवस्थापन नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले.

## श्री सदस्यांनी रूग्णालय केले स्वच्छ

**। माणगाव । प्रतिनिधी ।**
स्वच्छता हि सेवा हा उद्देश नजरेसमोर ठेऊन महाराष्ट्र भूषण डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान अंतर्गत डॉ.श्री आप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ.श्री सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव तालुक्यातील श्री सदस्यांनी माणगाव उपजिल्हा रुग्णालयाची स्वच्छता केली.




स्वच्छ भारत अभियान नागरी अंतर्गत केंद्रीय गृहनिर्माण तथा शहरी कार्य मंत्रालय भारत सरकार यांच्या मार्फत स्वच्छता पंधरवडा राबविण्याचे निर्देश देण्यात आले होते. याचाच एक भाग म्हणून स्वच्छता हि सेवा अंतर्गत उपक्रमाच्या अनुषंगाने माणगाव तालुक्यातील ५३५ श्री सदस्यांनी एकत्रित येत माणगाव शहरातील उपजिल्हा रुग्णालयाची स्वच्छता केली. यावेळी श्री सदस्यांनी रुग्णालय परिसरातून १५ टन इतका सुका कचरा गोळा करून हा कचरा ५ ट्रॅक्टर लावून उचलण्यात आला. श्री सदस्यांनी हाती घेतलेल्या या उपक्रमावेळी माणगाव उपजिल्हा रुग्णालयाच्या प्रभारी वैध्यकीय अधीक्षक डॉ.अरुणा पोहरे, परिचारिका शिवकांता गवळी आदी उपस्थित होते.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारीवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १.रिसेप्शन (पेमेंट-९०००-१३००० अनुभवानुसार) किमान १-२ वर्षे अनुभव आवश्यक. २. कॉंटिनेंटल कुक (पेमेंट-२२००० आणि वर अनुभवानुसार) किमान-५ वर्षे अनुभव आवश्यक. अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळात संपर्क साधावा आणि व्हॉट्सॲपवर रेझ्युमे शेअर करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२.
- अलिबाग आणि परिसरातील BSC पदवीधर उमेदवारांना Work From Home पद्धतीने कामकाज करण्याची सुवर्णसंधी त्वरित संपर्क करा. ९६८९८९२१२१
- अलिबाग स्टँडपासून दोन किलोमीटर परिसरात डबल टॉयलेट, कार पार्किंग असलेला २ BHK फ्लॅट रेडिपोझिशन, प्रशस्त सोसायटीमध्ये विकत घेणे आहे. फ्लॅट १० वर्षापेक्षा जास्त जुना नसावा. एजंट चालतील. मो. ९९७०४७३९२२
- अलिबाग परिसरामध्ये पर्यटकांच्या वर्दळीच्या ठिकाणी फर्निचरसहीत हॉटेल/कॉटेज भाडेतत्वावर चालविण्यास घेणे आहे. एजंटस्चे स्वागत मो. ९९२३०३६१५६
- मेडिकल एजन्सीजमध्ये कामासाठी मुले/मुली पाहिजेत. Akshay Agencies Pimpalbhat Near Suruchi Hotel (अलिबाग परिसर आणि १० km mtr परिसराकरीता) मो. ९५०३३५५८८६
- १५०० स्क्वे. फूटाची व्यावसायिक जागा भाड्याने देणे आहे. (दवाखाना, ऑफिस, बँक यांना प्राधान्य.) संपर्क : ९२८४५५५३१४ संपर्काची वेळ- दुपारी ४ ते रात्री ९
- घरकामासाठी बाई पाहिजे वेळ-सकाळी ८.३० ते १२.३० ठिकाण पंतनगर, अलिबाग संपर्क : ८०९७२०५९३९/९४२२३७२१५४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

**दिवसेंदिवस पुलावरील आत्महत्येच्या घटनांत वाढ**

# अटल सेतू ठरतोय सुसाईड पॉईंट?

**। रायगड । प्रतिनिधी ।**
**मुंबईतून पुणे, गोव्याला लवकर पोहोचण्यासाठी अटल सेतू उपयुक्त ठरला आहे; परंतु या अटल सेतूचे उद्घाटन झाल्यापासून गत नऊ महिन्यांमध्ये या पुलावर सहा आत्महत्येच्या घटना घडल्या आहेत. यापैकी एका महिलेला कॅबचालकाने वाचवले आहे; तर इतर पाच जणांचा पुलावरून समुद्रात उडी मारल्यामुळे मृत्यू झाला आहे. बुधवारी (दि. २) सकाळी माटुंग्यातील फिलिप शाह (५२) यांची सहावी आत्महत्येची घटना आहे. दिवसेंदिवस या पुलावरील आत्महत्येच्या घटनांत वाढ होऊ लागल्याने हा पूलदेखील आता सुसाइड पॉइंट ठरू लागला आहे.**

सर्वांत प्रथम मार्च महिन्यामध्ये दादर भोईवाडा परिसरात राहणाऱ्या किंजल शहा (४३) या महिला डॉक्टरने नैराश्येतून अटल सेतूवरून उडी टाकून आत्महत्या केली होती. त्यानंतर सोमवारी (दि. ३० सप्टेंबर) सुशांत चक्रवर्ती (४०) या बँकरने तणावामुळे अटल सेतूवरून समुद्रात उडी मारली होती. त्याचा मृतदेह दुसऱ्या दिवशी सापडला होता.

त्यानंतर लगेच दोन दिवसांनी बुधवारी (दि. २) माटुंगा येथील व्यावसायिक फिलीप शाह यांनी आत्महत्या केली. जुलै महिन्यामध्ये एका ३८ वर्षीय अभियंत्यानेदेखील अटल सेतूवरून उडी मारून आत्महत्या केली होती. त्या अभियंत्याचा मृतदेह अद्याप सापडलेला नाही. त्याचप्रमाणे पलावा सीटीतील रहिवासी करुतुरी श्रीनिवास यांनीही कामाच्या तणावातून अटल सेतूवरून उडी मारून आपले जीवन संपवले. त्याचाही मृतदेह अद्याप सापडलेला नाही.



ऑगस्ट महिन्यामध्ये अटल सेतूवरून उडी टाकण्याच्या प्रयत्नात असलेल्या व ब्रिजच्या रेलिंगला लटकलेल्या ५६ वर्षीय महिलेला कॅबचालकाने व न्हावा-शेवा वाहतूक पोलिसांनी वाचविले होते.

### कठड्याची उंची वाढवा

शिवडी- न्हावा- शेवा अटल सेतू (मुंबई ट्रान्स हार्बर लिंक)वरील आत्महत्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. यामुळे प्रशासनाची झोप उडाली आहे. २१ किलोमीटर लांबीचा हा पूल समुद्रापासून खूप उंचीवर बांधण्यात आला आहे. तणावग्रस्त लोक त्यांच्या वाहनाने पुलावर जातात, नंतर ते त्यांची वाहने पुलावर उभी करतात.त्यानंतर पुलाच्या कठड्यावरून ते समुद्रात उडी मारून आत्महत्या करत असल्याचे आढळून आले आहे. या पुलावरील कठड्याची उंची खूपच कमी आहे. त्यामुळे त्याच्यावर चढणे सोपे असल्यामुळे पुलावरील कठड्याची उंची वाढवण्याची मागणी पोलिसांकडून करण्यात येत आहे. त्यानुसार या पुलावर वेविंग बॅरिकेड्स लावण्याच्या हालचाली एमएमआरडीएकडून सुरू आहेत. ऑगस्ट महिन्यामध्ये अटल सेतूवरून उडी टाकण्याच्या प्रयत्नात असलेल्या व ब्रिजच्या रेलिंगला लटकलेल्या ५६ वर्षीय महिलेला कॅबचालकाने व न्हावा-शेवा वाहतूक पोलिसांनी वाचविल्याची घटना घडली होती. त्यामुळे आतापर्यंत आत्म हत्यांच्या झालेल्या घटनांमध्ये फक्त एका व्यक्तीला वाचवण्यात पोलिसांना यश आले आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक मनोहर मारुती गायकवाड यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे - कुशिवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ५०/२ | ०-३५-९० हे आर पॉ | ५-१९ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध बयानापावती खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास इरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक ०८/१०/२०२४ **ॲड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९१११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर.
अमराई रोड, कर्जत ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

---

**महाराष्ट्र शासन**
**सहकार विभाग**
**सहायक निबंधक सहकारी संस्था अलिबाग कार्यालय**
ब्राह्मण उत्कर्ष मंडळ इमारत, पहिला मजला, ब्राह्मण आळी,
पो.ता. अलिबाग जि. रायगड, पिन कोड ४०२२०१
Email ID : aresalibag@gmail.com

**सहायक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग यांचे समोर,**

अर्ज क्रमांक ६०/२०२४
दिनांक- ०७/१०/२०२४

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, अलिबाग
तर्फे श्री लंकेश भगवान नागांवकर तालुका निरीक्षक ... अर्जदार
विरूद्ध
१. श्री. खेळया ताया वारगुडा
पत्ता :- मु. खैरवाडी पो. रामराज, ता. अलिबाग, जि. रायगड
२. श्री. काशिनाथ मालू दरवडा -प्रतिवादी
पत्ता :- मु.पो. पिंपळभाट ता. अलिबाग जि. रायगड
३. श्री. किशोर धर्मा भोनकर
पत्ता :- मु. बोरघर पो. रामराज ता. अलिबाग जि. रायगड

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम चे कलम १०१ आणि नियम ८६ अन्वये वसुलीस प्राप्त रक्कम रु २,२९,८३७/-साठीचा अर्ज.

ज्या अर्थी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, अलिबाग तर्फे श्री लंकेश भगवान नागांवकर तालुका निरीक्षक, यांनी दिनांक २९/०७/२०२४ रोजी तुमचे विरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळण्याबाबत रितसर अर्ज या प्राधिकरणासमोर केलेला आहे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ८६ ब च्या तरतुदीस अनुसरुन अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी सदर अर्जामध्ये तुम्हा जाब देणार यांचे विरुद्ध रक्कम रुपये २,२९,८३७/(अक्षरी रुपये दोन लाख एकोणतीस हजार आठशे सदतीस मात्र) चे वसुली प्रमाणपत्र मिळावे म्हणुन विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी नियमाचे नियम ८६ ब नुसार सर्व प्रतिवादीना नोटीस दिनांक २९/०७/२०२४, रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पद्धतीने नोटीस निर्गमित करणेत आली होती. जी प्रतिवादी क्रमांक १ यांना बजाविली गेली नाही. तसेच दिनांक २३/०८/२०२४, रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पद्धतीने दुसरी नोटीस निर्गमित करणेत आली होती. जी प्रतिवादी क्रमांक १ यांना बजाविली गेली नाही. त्यामुळे अर्जदाराने जाहीर नोटिस देणेची विनंती केली. त्यानुसार प्रतिवादी यांना जाहीर नोटीस देणेत येते की, दिनांक २३/१०/२०२४ रोजी दिवसाचे सकाळी १०.०० वा सहायक निबंधक, सहकारी संस्था अलिबाग यांचे कार्यालय, ब्राह्मण उत्कर्ष मंडळ इमारत, पहिला मजला, ब्राह्मण आळी, पो.ता. अलिबाग जि. रायगड. पिन कोड ४०२२०१ या कार्यालयात तुम्ही स्वतः हजर राहावे व अर्जदार संस्थेने केलेले मागणीबाबत बचाव करण्याची परवानगी घ्यावी किंवा तसा अर्ज शपथपत्र नोटीस जाहीर केलेचे दिवसापासुन १० दिवसाच्या आत या प्राधिकरणासमोर सादर करावे. या कामी तुम्ही गैरहजर राहिलेस किंवा बचाव करणेचा अर्ज/शपथपत्र मुदतीत दाखल न केलेस, अर्जदाराने अर्जात केलेली अभिकथने आपण स्विकारली आहेत असे गृहीत धरून, अर्जाची चौकशी करुन, अर्ज नियम ८६ क अन्वये एकतर्फी निकालात काढणेत येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक ०७/१०/२०२४ सही/-
**(श्रीकांत पाटील)**
सहायक निबंधक
सहकारी संस्था अलिबाग

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांच्या सुचनेवरून आम्ही श्रीमती रिंकू दिनेश डालामल, (यापुढे मालक म्हणून संबोधित केलेल्या), ज्यांनी असे निवेदीत केले आहे की, खाली नमूद परिशिष्टात वर्णन केलेली व यापुढे 'सदर मिळकत' असे संबोधण्यात आलेल्या मिळकतीमध्ये त्यांस पुर्णपणे व निर्वेध मालकीहक्क आहेत, त्या मिळकतीचे मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

तरी ज्या व्यक्तीचा/व्यक्तींचा/व्यक्तीसमुहाचा/कंपनी/भागीदारी संस्था/एल-एलपी बँक/वित्तीय संस्था यांचा त्या मिळकतीमध्ये अथवा त्यांतील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये करार, संमतीज्ञापन, भागीदारी, खरेदी, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वारसा, बोजा, दान, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त, कुळवहिवाट, ताबा, परवाना, वहिवाट, कसवणुक, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोर्टाचा हुकूमनामा, वहिवाटीच्या रस्त्याचा करार या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असेल, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट ए.डी.द्वारे लेखी कळवावे. मुदतीत तसे कुणीही न कळविल्यास, सदर मिळकतीमध्ये कुणाचाही कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो कायम स्वरूपी सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार, हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही व सदर मिळकतीचे विद्यमान मालकांचे मालकी हक्क निर्वेध व निजोखमी आहेत असे मानून आमचे अशिल नियोजित खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन**

तुकडी व जिल्हा रायगड पोट तुकडी व तालुका अलिबाग जिल्हा निबंधक रायगड दुय्यम निबंधक अलिबाग यांचे अधिकार क्षेत्रातील जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती अलिबाग स्थानिक ग्रुप ग्रामपंचायत झिराडचे हद्दीतील मौजे झिराड येथील खालील वर्णनाची खुली व खुद्द मिळकत.

| मौजे | गट नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| झिराड | ३०५ | ०-३७-२०<br>०-२८-००<br>पो.ख. ०-०३-००<br>०-६८-२०<br>पैकी रिंकू दिनेश डालामल यांचे नावे असलेली ० हे.३१. २२ आर पोट खराब्यासह, आकार ४ रूपये ८३ पैसे एवढी मिळकत. | ११.१५ |

अलिबाग सही/-
तारीख : ०८/१०/२०२४ **ॲड.गणेश गोविंद पाटील**
अे १,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

---

**पनवेल महानगरपालिका, पनवेल**
**ई-निविदा सुचना**

पनवेल महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी संगीत व खेळाचे साहित्य खरेदी करणेबाबत या कामाची ई-निविदा पनवेल महानगरपालिका, पनवेल कडून मागविण्यात येत आहे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशील mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. संबंधित निविदा धारक यांनी त्याची नोंद घ्यावी.

पमपा/शिक्षण/निविदा/०५/२०२४
दिनांक: ०५/१०/२०२४

सही/-
**उपआयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

---

MAHATRANSCO
**EXTENSION TO SRM E-TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender**

**Specification.**

| | |
|---|---|
| Tender No. : E-Tender -07/2024-25<br>**Name of Tender :** Extension to E-Tender for the work of trimming of tree branches & disposing off the same outside the premises at Major Stores, Panvel for FY 2024-25.<br>**Tender Fee :- Rs. 500 /- + applicable GST**<br>**RFx No.- 7000033610** | **Online Downloading the RFx :** Dt.08.10.2024, 00:00 Hrs. to 14.10.2024, 23:59 Hrs.<br>**Online Submission of the RFx :** On or Before Dt. 14.10.2024, 23:59 Hrs.<br>**Online Opening of the Techno Commercial RFx :** Dt. 15.10.2024, at 10:00 Hrs. (If possible ).<br>**Online Opening of the Price bid:** Dt. 15.10.2024 at 12:00 Hrs. (If possible) |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person:** -The Executive Engineer, Mobile No. 8275215120

**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**Executive Engineer Major Stores, Panvel**

---

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
**SRM TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (SRM Tender) from registered contractors/suppliers on Mahatransco SRM E-Tendering portal for following works under EHV O&M Circle, Kolhapur.**

**Name of work :** SRM Tender for Work of Tower Leg re-earthing by providing and fixing Counterpoise and Pipe type earthing to legs of EHV towers of various EHV lines, under EHV O&M Division Ratnagiri (2nd call).

1. **RFx No.-** 7000033760
2. **Estimated cost:** Rs. 85,29,388/- (Including Taxes)
3. **E.M.D.:-** Rs. 85,294/- By Online Payment
4. **Tender Fee**:-Rs 590/- By Online Payment
5. **Date of Submission**:- Up to Closing date i.e. 13/10/2024 at 12:00 Hrs.
6. **Date of opening (Tech. bid):-** 13/10/2024 at 12:30 Hrs. onwards; if possible.

**For further details visit our website https://mahatransco.in/**

Note :- All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tendering portal (**https://srmetender. mahatransco.in**).

**(Save the Energy)** **Sd/-**
**Superintending Engineer, EHV O&M Circle, Kolhapur**

---

अर्जदारतर्फे ॲड. एस.जी.जोशी

## जाहीर नोटीस

**मुरूड येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात**

दि.चौ.अर्ज क्र. १५/२०२४
नि. ७/ड

१) श्रीमती संध्या आनंद जोशी,
वय ४८ वर्षे, व्यवसाय-शेती,
२) कु. सोनल आनंद जोशी,
वय २४ वर्षे, व्यवसाय- शेती, अर्जदार
३) अभिषेक आनंद जोशी
वय १९ वर्षे, व्यवसाय- शेती,
रा. भवानी पाखाडी नांदगाव,
ता. मुरूड जंजिरा, जि. रायगड
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

सर्व जनतेस कळविणेत येते की,

अर्जदार नं. १ हिचे पति आनंद प्रभाकर जोशी दि २६ नोव्हेंबर २०२० रोजी मौजे नांदगाव येथे मयत झाले आहेत. त्याचे पश्चात अर्जदार नंबर १ ते तीन हेच त्यांना कायदेशिर वारस आहेत. अर्जदारांचे व्यतिरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. कै. आनंद प्रभाकर जोशी यांची अर्जदार नंबर एक ही पत्नी, नंबर दोन व तीन ही मुले आहेत.

अर्जदार यांस कै. आनंद प्रभाकर जोशी यांचे मालकीची त्यांचे नावी असलेली मौजे पनवेल येथे सेक्टर १२, प्लॉट नं. १२ मधील सत्य शिवम सोसायटीमध्ये तळ मजल्यावर वाणिज्य गाळा नंबर दोन ही मिळकत नावे करून घेणेची आहे. त्याकरीता वारस दाखल्याची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार यांनी सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे.

तरी याबाबत कोणचीही हरकत असल्यास त्याने सदर हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसांचे आत या मे. न्यायालयात समक्ष हजर राहून लेखी स्वरूपात दाखल करावी. जर मुदतीत तशी कोणतीही हरकत आली नाही तर सदरचा दाखला अर्जदार यांस देण्यांत येईल व त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख ०३/१०/२०२४ रोजी माझ्या सही शिक्यानिशी प्रसिद्ध केली.

सही/- सही/-
**क. लिपीक** **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर** **दिवाणी न्यायालय क. स्तर**

---

अर्जदाराचे वकील
ॲड. एम. एम. ठाकूर

## जाहीर नोटीस

**मुरुड येथील मे. तहसिलदार सो. यांचे न्यायालयांत**

क्रि.चौ.अर्ज. /२०२४

उज्वला नितीन रोहेकर, ...अर्जदार
विरुध्द
ग्रामसेवक,
ग्रुप ग्रामपंचायत मांडला, ...सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड.

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदार यांची आई यशोदा यशवंत तळकर यांचा मृत्यु दि. २४/१२/२००७ रोजी गांव- मांडला, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड येथे झालेला असुन त्यांची मृत्यु नोंद, ग्रामसेवक ग्रुप ग्रामपंचायत मांडला, ता. मुरुड, जि. रायगड यांचे गा.न.नं. १४ जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे मृत्यु नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरुड तहसिल न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६९ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांची आई यशोदा यशवंत तळकर यांचा मृत्यु दि. २४/१२/२००७ रोजी झालेबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे. न्यायालयांत दि. २९/१०/२०२४ रोजी समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांना त्यांच्या आई यशोदा यशवंत तळकर यांची मृत्यु नोंद ही जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरमध्ये होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यांत येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

सही/-
**रोहन शिंदे**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

---

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

---

## जाहीर नोटीस

**मुरुड येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात**

दि.चौ.अर्ज क्र.१६/२०२४
नि. ७/ड

१) श्री विकास रामभाऊ पाटील
वय ६५ वर्षे, व्यवसाय मजुरी,
रा. सबनीस आळी मुरुड, ता. मुरुड जंजिरा, अर्जदार
जि. रायगड.
२) प्रथमेशा महेश जागडे
वय ३२ वर्षे, व्यवसाय गृहिणी,
रा. घोसाळे, ता. रोहा, जि. रायगड.
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

सर्व लोकांस कळविणेत येते की,

अर्जदार नं. १ ची पत्नी नम्रता विकास पाटील हि दिनांक ०९/०९/२०२३ रोजी मयत झाली आहे. तिचे पश्चात अर्जदार हेच त्यांना कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांचे व्यतिरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदार नं. १ हे तिचे पती आहेत व अर्जदार नं.२ हि मुलगी आहे.

अर्जदार यांस कै. नम्रता विकास पाटील यांचे पश्चात प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत लाभ घेणेकरीता वारस दाखल्याची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार यांनी सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे.

तरी याबाबत कोणचीही हरकत असल्यास त्याने सदर हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसांचे आत या में. न्यायालयात समक्ष हजर राहून लेखी स्वरुपात दाखल करावी. जर मुदतीत तशी कोणतीही हरकत आली नाही तर सदरचा दाखला अर्जदार यांस देण्यांत येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. आज तारीख ७/१०/२४ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी प्रसिध्द केली.

सही/- सही/-
**क. लिपीक** **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर** **दिवाणी न्यायालय क. स्तर**

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खाली नमूद केलेल्या जमिन मालकांने त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खाली वर्णन केलेली जमिन मिळकत आमचे पक्षकार यांना विकत देण्याचे ठरविले असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - गुढवण, ता. कर्जत, जि. रायगड जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| दशरथ नारायण खडे<br>एकनाथ नारायण खडे<br>नरेश नारायण खडे | ७० | ५ | ०-१२-२०<br>पो.ख. ०-०१-५०<br>०-१३-७० | १=१२ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिएन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्कहितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरून आवश्यक त्या बाबींची पूर्तता करून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

कर्जत
तारीख : ०८/१०/२०२४ खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
मोबाईल: ९८२२९११२०५ **श्री. अे.पी.डिमेलो**
**मु. भिसेगाव, ता.कर्जत, जि.रायगड**

---

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे नागांव ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक वर्षा अशोक नागावकर, रा.डी-३१९ राज शिवम सीएचएस, शिव वल्लभ रोड, कॉर्पोरेशन बँक जवळ, अशोकवन दहिसर मुंबई - ४०० ०६८ यांच्या नांवे असलेली सामाईक मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली मिळकत माझे स्नेही यांना कायमस्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| नागाव ता. अलिबाग जि. रायगड | ८०४ | ०-११-४० | १.९४ |

वर नमुद मिळकतीपैकी वर्षा अशोक नागावकर यांच्या मालकी हक्क व ताबेकब्जा वहिवाटीतील ०-०३-४० हे. आर. मिळकत..

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :- ०८/१०/२०२४ सही/-
**श्री. किशोर वामन तेलंगे**
पत्ता : श्री साई कन्सल्टंन्सी, दुय्यम निबंधक अलिबाग
कार्यालयासमोर गाळा क्र. ३ ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९८२२३४८१७३, ८८०५३२८६४६

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खाली नमूद केलेल्या जमिन मालकांने त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खाली वर्णन केलेली जमिन मिळकत आमचे पक्षकार यांना विकत देण्याचे ठरविले असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - कडाव, ता. कर्जत, जि. रायगड जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| सुयश मुरलीधर चैनी | ७७ | ३ | ०-०९-००<br>पो.ख.०-०१-००<br>०-१०-०० | ०=०८ |


तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिएन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्कहितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरून आवश्यक त्या बाबींची पूर्तता करून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

कर्जत
तारीख : ०८/१०/२०२४ खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
मोबाईल: ९८२२९११२०५ **श्री. अे. पी. डिमेलो**
**मु. भिसेगाव, ता. कर्जत, जि. रायगड**

---


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


---

## सुपरवायझर पाहिजे

वात्सल्य ट्रस्ट, शिशुगृह अलिबाग येथे पूर्णवेळ महिला सुपरवायझरची आवश्यकता आहे. सदर उमेदवाराचे शिक्षण १२ वी उत्तीर्ण आवश्यक आहे. सदर उमेदवार ३५ ते ४० वयोगटातील अलिबाग शहर परिसरातील असावी व स्वतःचे दुचाकी वाहन असल्यास प्राधान्य. इच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज व प्रमाणपत्रसह संस्थेच्या कार्यालयात गुरुवार दिनांक १७/१०/२०२४ रोजी दुपारी ठीक १२.००वाजता उपस्थित राहावे. पत्ता. वात्सल्य ट्रस्ट, घर नं १५१०, मयूर बेकरी मागे अलिबाग, रायगड ४०२२०१

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेंत येते की, आमचे अशिलांनी श्री. अस्पी जमशेद इराणी, रा. मुंबई यांचेकडून त्यांचे मालकीच्या मौजे तिवरे, तालुका कर्जत, जि. रायगड येथील खाली नमूद केलेप्रमाणे शेतजमीनींच्या मिळकती कायम खरेदी घेणेचे ठरविले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे तिवरे, तालुका कर्जत, जि. रायगड येथील मिळकतींचे वर्णन :**

| अ.क्र. | भूमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.= पै. |
|---|---|---|---|
| १. | १३/१/अ | ०-४०-०० | ०६=०० |
| | पैकी | ०-२०-०० | ०३=०० |
| २. | १३/१/ब | ०-२३-७० | ०३=४५ |

येणेप्रमाणे वर वर्णन केलेल्या शेतजमीनींच्या मिळकती तीमधील दगडमाती, झाडझाडोरा, पाणी जाण्यायेण्याचे मार्ग व हक्क, वहिवाटीचे व इजमेंटचे मार्ग व हक्क वगैरे तद्ंगभूत सर्व वस्तू, हक्क, हितसंबंध यासुद्धा.

वर वर्णन केलेल्या मिळकतींवर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, पोटगी, कबजा, लिज, कुळवहिवाट, बोजा, ताबा, इजमेंट, साठेकरार, लिएन अगर अन्य कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह तसे लेखी कळवावे. सदर मुदतीत आमचेकडे कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल फरोक्ताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर मागाहून उपस्थित केलेली कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाही व ती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : ०७/१०/२०२४. सही/-
**श्री. प्रसन्न चंद्रकांत शिंदे.**
बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट
७५, अभिराज, मु. भिसेगांव,
पो. गुंडगे ता. कर्जत, जि. रायगड.

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)**

**ज.म.र अर्ज ४३/२०२४**

## जाहिर नोटीस

प्रति,
श्री. सलीम अब्दुल कादिर गोंडेकर
रा. रेवदंडा बाजारपेठ, पो. रेवदंडा अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड
विरुध्द
ग्रुप ग्रामपंचायत रेवदंडा
ता. अलिबाग, जि. रायगड सामनेवाला

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे रेवदंडा अलिबाग, ता. अलिबाग येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचा भाचा श्री. इरफान अजिम शेख जन्म दि. १८/१२/१९७६ रोजी मौजे रेवदंडा, येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत रेवदंडा येथे केलेली नसल्याने त्यांचा जन्म दाखला मिळण्यासाठी जन्म नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत रेवदंडा यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. २१/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. २७/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग सही/-
तारिख : २७/०९/२०२४ **(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल मनरंजन दशरथ शिरधनकर रा. मु. सातिर्जे, पो. मापगांव, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी सांगितले वरून दिलेले माहितीवरून व दाखविलेल्या कागदपत्रावरून जाहिर नोटीस देण्यात येते की,

आमचे अशिलांचे नाव मनरंजन दशरथ शिरधनकर असे असून त्यांचे आधार कार्ड नं. ७४६७ ६८५० ७५२ व पॅन कार्ड नं. FTHPS6666H वर आमचे अशिलांचे नाव मनरंजन दशरथ शिरधनकर असे दाखल आहे. परंतु आमचे अशिलांच्या नावे मौजे सातिर्जे ता. अलिबाग, जि. रायगड, गट नं. ३०२, एकुण क्षेत्र १-१३-०० हे. आर. पैकी अशिलांच्या मालकीचे क्षेत्र १-०७-९० हे.आर. अशा वर्णनाची मिळकत असून सदर मिळकतीचे ७/१२ उताऱ्यावर आमचे अशिलांचे नाव मनोरंजन दशरथ शिरधनकर असे दाखल आहे. सदरचे नाव चुकीने ७/१२ सदरी दाखल झालेले आहे. मनरंजन दशरथ शिरधनकर व मनोरंजन दशरथ शिरधनकर या दोन्ही नावाच्या वेगवेगळया व्यक्ती नसून एकच व्यक्ती आहे.

आमचे अशिलांचे नाव मौजे सातिर्जे ता. अलिबाग, जि. रायगड, गट नं. ३०२ चे ७/१२ सदरी मनोरंजन दशरथ शिरधनकर असे चुकीने दाखल झालेले असल्यामुळे त्याऐवजी मनरंजन दशरथ शिरधनकर असे नाव दाखल करणेकामी मे. उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्या कोर्टात अपील क्र. ६६/२०२४ दाखल केलेले आहे. त्याबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास ती त्यांनी दिनांक २२/१०/२०२४ पुर्वी खालील सही करणार यांच्याकडे कागदोपत्री पुराव्यासह सादर करावी.

अलिबाग,
तारीख : ०७/१०/२०२४ **(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.







# स्वतःच्या हक्कासाठी महिलांनी पुढे या

**ॲड. मानसी म्हात्रे यांचे आवाहन**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

खारेपाट विभागातील ही भूमी संघर्ष करणारी आहे. या भूमीत हक्कासाठी अनेक लढे झाले आहेत. स्व. दत्ता पाटील, स्व. प्रभाकर पाटील यांच्यासह शेकापचे नेते जयंत पाटील, पंडित पाटील, भावना पाटील, आस्वाद पाटील यांनीदेखील त्यांचा वारसा जपत या भागातील सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्याचे काम केले. या विधानसभेच्या निवडणुकीत विरोधकांना स्त्रीशक्तीची ताकद दाखविण्याची वेळ आली आहे. शिवबा, जिजाऊंच्या लेकी परक्याचा वाटा घेणार नाही, असा निर्णय घेत महिलांनी स्वतःच्या हक्कासाठी पुढे यावे, असे आवाहन शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांनी केले.

चित्रलेखा पाटील यांनी महिलांसाठी मेळावे सुरु केल्यावर विरोधकांनाही वाटले आपणही मेळावे घ्यावे, अशी टीकाही त्यांनी यावेळी केली. मेळाव्यात मार्गदर्शन करताना पुढे ॲड. म्हात्रे म्हणाल्या की, हाशिवरे येथील बालवीर मैदानात शेकापमार्फत महिला संवाद मेळावा होत आहे. हाच मेळावा पुढच्या इतिहासाची नांदी असणार आहे. या मेळाव्यातून एक वेगळी उमेद, शक्ती घेऊन महिलांनी परिवर्तन घडविण्याचे काम केले पाहिजे. महिलांनी वेळप्रसंगी दोन हात करून अन्यायाविरोधात लढले पाहिजे. पुढचा आमदार कोण असणार हे महिलाच ठरविणार आहेत.

महिलेच्या हाती विकासाची दोरी द्या, त्याचा उपयोग देशाच्या, राज्याच्या, जिल्हा, तालुका, गाव व समाजाच्या विकासासाठी महिला निश्चित करतील. महिलांनी सुरु केलेले रोजगाराचे दालन बंद करण्याचे काम स्थानिक लोकप्रतिनिधी करत असतील, तर ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबतचा निर्णय महिला ठरवतील. याची जाणीव असणे आवश्यक आहे, असेही त्या म्हणाल्या.






## महिलांनी अत्याचाराविरोधात पेटून उठावे : सीमा घरत

सरकार आपल्याच टॅक्समधून योजना राबवित आहे. सध्या लाडकी बहीण योजना राबविण्यात आली आहे. या योजनेतून दीड हजार रुपये महिलांना दिले जातात. मात्र, महागाई गगनाला भिडली आहे. महिन्यातील खर्चाचा ताळमेळ बसविताना महिलांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. महिला सुरक्षेचा प्रश्नदेखील गंभीर आहे. त्यामुळे आपल्या हक्कासाठी लढणारी महिला आमदार झाली पाहिजे. असा प्रत्येक महिलेने निश्चय केला पाहिजे. अत्याचाराबरोबरच अन्यायाविरोधात महिलांनी पेटून उठले पाहिजे, असे आवाहन शेकाप उरण तालुका महिला आघाडी प्रमुख सीमा घरत यांनी केले.

शेकापच्या नेत्या स्व. मीनाक्षी पाटील यांनी मंत्री, आमदार असताना जिल्ह्यातील विकासासाठी काम केले. अलिबागसह रायगडच्या विकासामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत चित्रलेखा पाटील आज समाजात काम करीत आहेत. चित्रलेखा पाटील यांनी रात्रीचा दिवस करून कोरोना काळात काम केले. ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाचा मार्ग मोकळा व्हावा, यासाठी मुलींसाठी सायकल वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम चित्रलेखा पाटील यांनी केले आहे. राज्यात सध्या भयावह परिस्थिती आहे. महिला सुरक्षेचा प्रश्न गंभीर आहे. राज्यात महिला सुरक्षित नाहीत. रोजगाराचा प्रश्न आहे. अशा अनेक समस्या आहेत. त्यामुळे आपले प्रश्न मांडणारी महिला आमदार झाली पाहिजे, ही आपली भूमिका आहे. त्यानुसार महिलांनी कामाला लागा, असे आवाहन घरत यांनी केले.



### मान्यवरांच्या स्वागताला फुलांचा वर्षाव

**महिलांच्या संवाद मेळाव्याला हजारोंच्या संख्येने महिलांनी उपस्थिती दाखविली होती. चित्रलेखा पाटील, सुप्रिया पाटील, ॲड. मानसी म्हात्रे, सीमा घरत आदी मान्यवरांचे कार्यक्रमाच्या ठिकाणी आगमन होताच सर्व महिलांनी उभे राहून त्यांच्यावर फुलांचा वर्षाव करीत जल्लोषात स्वागत केले. दरम्यान, बँड पथकाच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत विविध गाण्यांवर महिलांसह मान्यवरांनी ठेका धरल्याचे दिसून आले.**

### कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**वैजाळी हाशिवरे येथील बालवीर मैदानात भव्य महिला संवाद मेळावा आयोजित करण्यात आला. या मेळाव्यानिमित्त विभागातील तीसहून अधिक कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. राजकीय, सामाजिक, क्रीडा, शैक्षणिक, सहकारी, बँकिंग, सांस्कृतिक, व्यवसायिक, उद्योजक अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.**


● (छायाचित्र : समीर मालोदे)

# भारताचा ६ गडी राखून विजय

**। दुबई । वृत्तसंस्था ।**

संयुक्त अरब अमिरातीच्या दुबई आंतराष्ट्रीय मैदानावर झालेल्या महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारत विरुद्ध पाकिस्तानच्या सामन्यात कर्णधार हरमनप्रीत कौरच्या २९ धावांच्या निर्णायक खेळीने भारतीय संघाने पाकिस्तानचा ६ गडी राखून पराभव केला. भारतीय संघाचा नेट रन रेट चांगला नसल्याने टीम इंडिया गुणतालिकेत अखेरच्या स्थानी आहे. पण या विजयानंतर टीम इंडियाने २ गुण मिळवत एका स्थानाची झेप घेतली आहे.




नाणेफेक जिंकून पाकिस्तानची कर्णधार फातिमा सनाने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सामन्याच्या पहिल्या षटकाच्या अखेरच्या चेंडूत रेणुका सिंघच्या गोलंदाजीवर गुल फिरोजला क्लीन बोल्ड करत शून्य धाव संख्येवर माघारी पाठवत पाकिस्तानच्या संघास पहिला धक्का दिला. सामन्याच्या पाचव्या षटकात दीप्ती शर्मांने सिद्रा अमीनला क्लीन बोल्ड करत आठ धावांवर तंबूत परत पाठविले. सातव्या षटकात अरुंधती रेड्डीच्या गोलंदाजीवर शैफाली वर्माने उमेमा सोहेलला ३ धावांवर झेल बाद केले. सामन्याच्या दहाव्या शतकात श्रेयंका पाटीलच्या गोलंदाजीवर रिचा घोषने मुनीबा अलीला स्टंप आउट केले. मुनीबा अलीने २६ चेंडूत १७ धावा केल्या.

सामन्याच्या १३ व्या शतकात अरुंधती रेड्डीच्या गोलंदाजीवर आलिया पायचीत होऊन चार धावा करत तंबूत परतली.सामन्याच्या १४ व्या शतकात आशा शोभनाच्या गोलंदाजीवर रिचा घोषने फातिमा सनाला झेल बाद केले. सयेदा अरुब शहा ने १४ धावा तर नश्रा संधूने नाबाद ६ धावा केल्या. २० व्या षटका अखेर पाकिस्तानच्या संघाने ८ गडी बाद १०५ धावा केल्या. भारतीय संघाकडून शैफाली वर्मा व स्मृती मंधना प्रथम फलंदाजीस आल्या.सामन्याच्या पाचव्या षटकात सईदा इक्बालच्या गोलंदाजीवर तुबा हसनने स्मृती मंधनास झेल बाद केले. स्मृती मंधनाने १६ चेंडूत ७ धावा केल्या. सामन्याच्या १२ व्या षटकात ओमिमा सोहिलच्या गोलंदाजीवर आलीय रियाजने शैफाली वर्माला झेल बाद केले. शैफाली वर्माने ३५ चेंडूत ३२ धावा केल्या. १६ व्या षटकात फातिमा सनाच्या गोलंदाजीवर मुनीबा अलीने जेमायमाह रॉड्रिगेसला झेल बाद केले.

जेमायमाह रॉड्रिगेसने २८ चेंडूत २३ धावा केल्या. हरमनप्रीत कौरने २४ चेंडूत २९ धावा करत जखमी झाल्याने १९ व्या षटकात मैदान सोडावे लागले. दीप्ती शर्माने ७ तर संजीवनने नाबाद ४ धावा केल्या. एकोनावीसाव्या षटकाच्या अखेरीस भारतीय संघाने ४ गडी बाद १०८ धावा व ७ चेंडू राखून पाकिस्तानच्या संघावर विजय मिळविला.

# सनथ जयसूर्या श्रीलंका संघाचा मुख्य प्रशिक्षक

**कोलंबो :** भारत, इंग्लंड आणि न्यूझीलंडविरुद्धच्या श्रीलंका संघाच्या शानदार कामगिरीनंतर माजी कर्णधार सनथ जयसूर्याची श्रीलंका पुरुष क्रिकेट संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. सनथ जयसूर्याची नियुक्ती १ ऑक्टोबर २०२४ पासून ते ३१ मार्च २०२६ पर्यंत करण्यात आली आहे. श्रीलंकेच्या क्रिकेट संघाने घरच्या मैदानावरील कसोटी मालिकेत न्यूझीलंडचा २-० ने क्लीन स्वीप केला होता. गेल्या काही काळापासून श्रीलंकन संघाच्या या कामगिरीत कमालीचे सातत्य दिसून येत आहे. सनथ जयसूर्याने संघाच्या प्रशिक्षकपदाची जबाबदारी स्वीकारल्यापासून संघाची कामगिरी उत्कृष्ट राहिली आहे. या काळात श्रीलंकेने एकदिवसीय मालिकेत भारताचा पराभव केला. त्यानंतर इंग्लंडला त्याच्याच भूमीवर कसोटी सामन्यात पराभूत केले आणि आता न्यूझीलंडविरुद्ध कसोटी मालिका जिंकली. त्यामुळे आता सनथ जयसूर्याची श्रीलंकेचा पूर्णवेळ प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. श्रीलंका क्रिकेटच्या एका निवेदनानुसार श्रीलंका क्रिकेटच्या कार्यकारी समितीने भारत, इंग्लंड आणि न्यूझीलंडच्या नुकत्याच झालेल्या दौऱ्यांवरील संघाची चांगली कामगिरी लक्षात घेऊन हा निर्णय घेतल्याचे म्हटले आहे.


● नेरळ-कोल्हारे हजारे नगर सार्वजनिक नवरात्रौत्सवास मनसे रायगड जिल्हाध्यक्ष जीतू पाटील आणि नवनिर्वाचित कर्जत तालुका अध्यक्ष यशवंत भवारे तसेच मनसे पदाधिकारी यांनी भेट दिली.

**प्रीती झिंटाच्या संघाने सीपीएल २०२४ मध्ये पटकावले पहिले जेतेपद**

# ताहिरच्या संघाला चारली पराभवाची धूळ

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

अभिनेत्री प्रीती झिंटा आयपीएलमधील पंजाब किंग्जची सहमालक आहे. तिच्या संघाला अद्याप एकही विजेतेपद मिळवता आलेले नाही. सर्व १७ हंगाम खेळूनही संघ केवळ एकदाच अंतिम फेरीत पोहोचला आहे. मात्र, आयपीएलमध्ये सातत्याने अपयश येत असताना प्रीती झिंटासाठी एक आनंदाची बातमी आली आहे. तिच्या मालकीच्या सेंट लुसिया किंग्ज संघाने कॅरिबियन प्रीमियर लीग म्हणजेच सीपीएल २०२४ चे विजेतेपद पटकावले आहे. या संघाने अंतिम फेरीत गयाना ॲमेझॉन वॉरियर्सचा ६ गडी राखून पराभव करत ट्रॉफीवर नाव कोरले.



कॅरिबियन प्रीमियर लीग २०२४ चा अंतिम सामना रविवारी ६ ऑक्टोबर रोजी गयाना ॲमेझॉन वॉरियर्स आणि सेंट लुसिया किंग्ज यांच्यात गयाना येथील प्रोव्हिडन्स स्टेडियमवर खेळला गेला. सेंट लुसिया किंग्सने हा विजेतेपदाचा सामना जिंकला आणि संघ प्रथमच सीपीएलचा चॅम्पियन ठरला. प्लेसिसच्या नेतृत्वाखालील सेंट लुसिया किंग्जने इम्रान ताहिरच्या नेतृत्वाखालील गयाना संघाचा ६ गडी राखून पराभव केला. यावेळी ४५ वर्षीय कर्णधार इम्रान ताहिरची जादू चालली नाही, ज्याने २०२३ चे विजेतेपद जिंकून इतिहास लिहिला होता. कारण तो टी-२० लीग जिंकणारा सर्वात वयस्कर कर्णधार ठरला होता. या सामन्याबद्दल बोलायचे तर सेंट लुसियाचा कर्णधार प्लेसिसने नाणेफेक जिंकून गयाना ॲमेझॉन वॉरियर्सला फलंदाजीसाठी आमंत्रित केले होते. गयाना संघाने २० षटकात ८ गडी गमावून १३८ धावा केल्या होत्या. संघातील जवळपास प्रत्येक खेळाडूला चांगली सुरुवात मिळाली होती, पण कोणीही मोठी खेळी करू शकले नाही. रहमानुल्ला गुरबाज (०) वगळता, इतर खेळाडूंनी किमान दुहेरी आकडा नक्कीच पार केला. मात्र, ड्वान प्रिटोरियसने (२५) सर्वाधिक धावा केल्या. शाई होपने २२ धावा केल्या. सेंट लुसियाकडून नूर अहमदने ३ विकेट्स घेतल्या, तर संघाच्या उर्वरित पाच खेळाडूंना प्रत्येकी एक विकेट मिळाली.

# पी.एन.पी. शाळेने जिल्हास्तरीय अजिंक्यपद जिंकले

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

पीएनपी होली चाईल्ड सीबीएसई शाळेच्या विद्यार्थ्यांनी नुकत्याच संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत अजिंक्यपद जिंकून अभिमानास्पद कामगिरी करून दाखवली आहे. अथर्व दत्तात्रय मोरे, इयत्ता ९वी, याने १७ वर्षांखालील ७५ ते ८० किलो वजनी गटात अजिंक्यपद मिळवले आहे.



ही स्पर्धा पिल्लई एचओसीएल शैक्षणिक संकुल रसायनी येथे जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या सहयोगाने आयोजित करण्यात आली होती. आता अथर्वची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली असून ती स्पर्धा लवकरच पार पडणार आहे. इयत्ता ९वी झीशान शफी झेंडेकर यांनी ५५ ते ६० किलो वजनी गटात दुसरे स्थान मिळवत उपविजेतेपद प्राप्त केले आहे.

शाळेची खेळ आणि शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी ही संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा नृपाल पाटील यांच्या मोलाच्या मार्गदर्शनाचा परिणाम आहे, असे शाळेच्या मुख्याध्यापिका वेल्लईमल मुरुगन यांनी वेश्वी येथील होली चाईल्ड सीबीएसई शाळेच्या यशाबद्दल भाष्य केले.

चित्रलेखा नृपाल पाटील यांनी मुख्याध्यापिका वेल्लईमल मुरुगन, उपमुख्याध्यापिका सदाफ शाहबाजकर, क्रीडा शिक्षक आदित्य यादव, विद्यार्थी आणि संपूर्ण सीबीएसई टिमचे अभिनंदन केले आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)